# कोंडवाडा

दया पवार

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २१९०



REFBK-0020124
REFBK-0020124

काव्य २११० संदर्भ काव्य २११०

…जी ग्रंथ संग्रहालय, सार्व. लखनऊ
…क्रम ………………… दि: ……… २०७२४
… ………………… को दि: २७।११।८४

# कोंडवाडा

दया पवार

REFBK-0020124
REFBK-0020124

मागोवा प्रकाशन

प्रकाशक
मागोवा प्रकाशन
१२५९/२ जं. म. रस्ता,
पुणे ४११ ००४

कोंडवाडा

दया पवार

© सौ. हिरा पवार
१३/१०० सिद्धार्थ नगर,
गोरेगाव(प), मुंबई ४०० ०६२

ऑगस्ट १९७४

मुद्रक
मागोवा मुद्रण
१२५९/२ जं. म. रस्ता,
पुणे ४११ ००४

किंमत पाच रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २०१२४
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

माणसाचा कोंडवाडा करणाऱ्या
माझ्या देशा
तुझ्या नावानं--

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | प्रक्षोभ | १ |
| २ | आवर्त | ३ |
| ३ | तुम्ही प्रकाशाचे पुंजके व्हा | ५ |
| ४ | ये हेमांगी | ७ |
| ५ | हिरोशिमा | ९ |
| ६ | रक्तलाट | १० |
| ७ | देह | ११ |
| ८ | सभा | १२ |
| ९ | लॉस एंजल्सवरून तू लिहिलंस | १४ |
| १० | हे महाकवे | १५ |
| ११ | गस्त नसलेली वस्ती | १६ |
| १२ | खांदा | १७ |
| १३ | मरण | १९ |
| १४ | कोंडवाडा | २० |
| १५ | गांधी जन्मशताब्दी | २१ |
| १६ | खुळखुळ्याची काठी | २३ |
| १७ | रक्तात पेरून गेलेला | २४ |
| १८ | वस्ती | २५ |
| १९ | हार्लेम | २६ |
| २० | टेरीलीन शर्टातला मी | २७ |

२१ संस्कृती २९
२२ क्रूस ३०
२३ हे महान देशा ३१
२४ चिमणी ३३
२५ मानिनी ३४
२६ देव शेंदराचे ३६
२७ सुरुंग ३७
२८ शहर ३९
२९ पाय ४०
३० सीमा ४१
३१ कोंडा ४३
३२ सिद्धार्थ नगर ४६
३३ पावसा पावसा तू आलास ४८
३४ क्रांती ५०
३५ कोंडवाडा ५१
३६ गळाबंद बुलंद आवाज ५२
३७ जाळ ५३
३८ खांडववन ५४
३९ फाळ ५५
४० झाड ५६
४१ तारे ५७
४२ ब्रोकन मेन ५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
२०९२४ २५।८।७४
२१८० २/२/१९

## माझे शब्द

खुद्द संग्रहातील कवितेसंबंधी तसा मी कमी बोलणार आहे. कवितांच्या अंतरंगात शिरण्यापूर्वी तिच्या मागचे अनुभवविश्व, कविता घडण्यापूर्वीची मानसिक अवस्था, घटनांचे क्रम, झालेली विलक्षण घुसमट, यांचा शोध घेण्याचा हा एक प्रयत्न.

संग्रहात सामावलेल्या कविता सोडून तसे मुबलक कविता लेखन मी केलेले आहे. त्यातील एकही कविता या संग्रहात घालण्याची इच्छा होत नाही. या मागील कारणमीमांसा कोणती, कवितेच्या संदर्भात माझ्या जाणीवा कशा बदलत गेल्या, वेळोवेळी मी ज्याने प्रभावित झालो ते नेमके अस्सल होते की नक्कल, हे पहाणे महत्वाचे वाटते.

मी पहिली कविता केव्हा लिहिली असावी? हे शोधण्यापूर्वी कवितेची जाणीव तरी कशी निर्माण झाली हे तपासायला हवे. बालपणात माझ्या वाटचाला नेमके कोणते संस्कार आले, सांस्कृतिक जीवन कोणते होते हे सारं पाह्यले म्हणजेच माझ्या आजच्या कवितेची वीण व तिची पाळेमुळे कुठवर पोचलीत हे समजू शकेल.

मी तसा घाटावरचा. तालुक्यात सह्याद्रीच्या रांगेतील फाटा गेलेला, उंच असे कळसुबाईचे शिखर, तिथून मुंबई बेट टळटळीत दिसणारे. जन्मगावापासून जवळच अमृत वाहिनी प्रवरा दुथडी भरून वहाणारी. गाव तर डोंगराच्या कुशीत वसलेले. अशा निसर्ग-परिसरात गावकुसाबाहेर 'कोंडवाड्यात' माझा जन्म झाला.

माझ्या जन्मामुळे कोणत्याही दिशेला तारा निखळला नाही. किंवा मला सूर्यबिंब फळासारखे वाटले नाही. जमिनीवर पाय ठेवूनच मी चालू लागलो. कळू लागले तेव्हापासून वास्तवतेच्या दाहक चटक्यांनी होरपळलो. भोवताली पसरलेला समृद्ध निसर्ग काटचासारखा बोचू लागला. मला एकही निसर्ग कविता लिहिता आली नाही याचे नेमके कारण हेच असावे. मराठी कवींनी आपल्या कवितांमधून चितारलेला निसर्ग केव्हाच मनाला रिझवू शकला नाही. या देशातील जातीजातीची मडक्यांची उतरंड. नुसती श्रमाची विभागणी नाही तर श्रमिकांची विभागणी. एक जात नेमकी दुसऱ्या जातीच्या तोंडावर बसलेली. त्यामुळे गुदमरलेली अवस्था. आपण तर अगदी तळचे मडके. त्यातही रांडकीच रांड प्वार. पाणलोटानं कचरा किनाऱ्याला लोटावा तसं आपलं आयुष्य.

बामना घरी लिव्हणं, कुणब्या घरी दाणं, महाराघरी गाणं, ही म्हण लहानपणापासून ऐकत असू. गाणं बजावणं करणं म्हणजे हिणकस धंदा करणं हा त्यात सूर होता. सवर्णांच्या घरी गाणं आणि महाराघरी गाणं ह्यात सांस्कृतिक दृष्टचा एकच पातळी नव्हती. केवळ बलुत्यासाठी किंवा पाच दहा रुपयासाठी ह्या गाण्यामुळे आपले पूर्वज कोणाचे मनोरंजन करीत होते? ह्या गाण्यातून त्यांनी दुःखाचा शोध घेतलाय काय? तसे जर झाले असते तर किती मोठा सांस्कृतिक ठेवा आपल्याला मिळाला असता. लिव्हणं आणि दाणं हे आपल्या वाटचाला का नव्हतं? 'दाणं' नसेल तर गाणं कसं सुचेल? दाणं मिळविण्यासाठी वाजंत्र्याच्या ताफ्यात किंवा ढोलकं तुणतुणं घेऊन आपण तालेवाराच्या पुढे गाणं का गायचं? असे प्रश्न लहान वयातही सुचत होते. ज्या लहान वयात मराठीतले आजचे उच्चवर्णीय कवी, ज्ञानेश्वर, तुकाराम, रामायण, महाभारत यावर कवितेची जाणीव पोसतात त्या वयात माझ्यापुढे काय ताट वाढून ठेवले होते?

लहानपणी पाहिलेला महारवाडा स्वच्छ दिसतो आहे. दहाबारा वर्षाचे वय असावे. स्वातंत्र्याची जिलबी वर्गात मिळाल्याची आठवण आहे. शाळा सुटली म्हणजे महारवाडचातील आम्ही मुले चावडीत जमायचो. यातील काही गुरांकडे जाणारी होती. आमच्यापैकी एखाद्या चुणचुणीत पोराला लुगडं नेसवायचं. पायात बाभळीच्या शेंगा चाळ म्हणून बांधल्या जायच्या. डफडी, डबे याच्या साथीत 'तमाशा' उभा राह्यचा. अग बयोऽ शेर ताटीमे लांडगा गयोऽऽ। सोडा लिंबू बाटलीमध्ये। पोरी दम धर ग छातीमध्ये। अशा गाण्यांना झिलकऱ्याच्या साथीत जोश चढायचा. हा सारा प्रकार त्या काळी कुणालाच अश्लील वाटत नव्हता हे विशेष. ह्या प्रतिमांच्या पाठीमागे वेगळेच विश्व दडलेले आहे हे कळण्यास बराच काळ जावा लागला.

वडिलांचा वाजंत्र्याचा ताफा होता. लग्नसराईत त्यांना भाव यायचा. ताफ्यात वडील 'कांडं' वाजवीत. कधी कधी मी त्यांच्या बरोबर जात असे. संबळ वाजायला लागला की माझाही देह भारावून जायचा. फावल्या वेळात माझ्या वयाची मुले त्यांचे अनुकरण करीत. तोंडातून आवाज काढून सारा ताफा हुबेहूब उभी करत. फावल्या वेळात तो 'दम' शिकत. सरमाडाची काडी पोकळ करून डबडाभर पाण्यात बुडवून 'दम' घेत. कांडं किंवा सूर शिकण्याआधीची ती पूर्वतयारी होती.

पुढे मी शाळकरी झालो. वाजंत्रीपणा शिकणे म्हणजे घाणेरडे काम करणे ही जाणीव प्रबळ झाली. वाजंत्र्याच्या पत्रावळचा उकीरड्यावर. ठायी ठायी मानहानी. हा धंदा गुलामगिरीचे जोखड वाटायचे. आज मला कोणतंच वाद्य वाजवता येत नाही. खरं म्हणजे संगीत घरात पिकत होतं. आपण त्याकडे जाणूनबुजून पाठ फिरवली. यात आपला दोष किती? हा आनंद कोणी नासवून टाकला? आज एखाद्या सुखवस्तू घराण्यातील पोरगं गॅलरीत बसून अलगूज वाजवताना मी

पहातो तेव्हा मला त्याचा हेवा वाटतो. लहान वयातच कलेकडे पहाण्याची ही दृष्टी. समाजव्यवस्था याला जबाबदार.

वडिलांना लावण्यांचा छंद, खुंटीला ढोलकी आणि तुणतुणे टांगलेले. थकून भागून वडील आले म्हणजे अंगणात जोडीदाराबरोबर ढाल्या सूरात ढोलकीच्या साथीत ते गात. "तू ग ऐक नंदाच्या नारी ऽ". गावात तमाशा आला म्हणजे तो नेमका आमच्या घरी उतरायचा. त्याची गंमत वाटायची. त्याच्यातला सरदार खाजगीतही खूप शुद्ध बोलतोय असे वाटायचे. रात्रीला ते राजा आणि प्रधान व्हायचे पण सकाळ उजाडली म्हणजे विडीला त्यांच्याजवळ पैसा नसायचा. पावसाळ्यात अळ्यासारखे तडफडायचे. त्यांच्यात 'मास्तर' नावाचा प्राणी असायचा. नाचनारणींच्या घोळक्यात तो लावण्या बांधायचा. गांज्याची चिलीम झोकली म्हणजे त्या तारेत तो शब्द जुळवायचा. छुमछुम छणाणा। उभी राहून बोल ग जरा। किंवा, ये माझ्या लाडक्या छबिल्या। मशी बोल. अकस्मात मास्तरला शब्द कसे सुचतात याचे बालमनाला कोडे पडायचे. बराच काळ आपण तमासगीर व्हावे असे वाटायचे ते यामुळेच. मराठीतील संत पंत नाहीत पण अशा तंताने नकळत परिणाम केला असावा.

दुसरी अशीच आठवण रायरंदाची. रायरंद ही भटकी जमात. उंटावर सारा संसार लादून गावोगाव लोकांचे मनोरंजन करणे हा यांचा धंदा. रायरंदाचे वैशिष्टच असे की गावात न जाता ते फक्त महारवाड्यात उतरत. घराघरातून त्यांच्या करिता शिधा गोळा व्हायचा. महारवाड्यातील मंडळी सोडून कुणाचेही 'दान' ते घेत नसत. रात्री त्याचा तमाशा फड, सकाळी सोंग, हा प्रकार बघण्यासारखा. त्यांच्या जिभेवर अनुभवसिद्ध रसवंती. अनेक गावचे पाणी ते प्यालेले, मराठीचा झणझणीत ठसका, रंगीत पटक्याचा शेला

छातीवर रूळतो आहे, हातात रूमालात बांधलेला कवड्या घातलेला रिकामा नारळ, या तालावर ते नाचतात.

" तुंबडीभर दीना आणि बाजीराव नाना " हे त्यांचे पालुपद. हे सारे अप्रूप वाटायचे. पुढे बराच काळ मी 'तुंबडीभर दीना' या शब्दाचा विचार करतोय. दीना म्हणजे मोगल कालीन नाणे का? का देना या शब्दाचा अपभ्रंश ? एका भिकाऱ्याने दुसऱ्या भिकाऱ्याला भीक द्यावी तसा तो प्रकार. भारतीय संस्कृतीने सर्वांचा अहंकार असा नकळत पोसलेला, बिचारे महार तरी त्यातून कसे सुटणार ?

रायरंदाबरोबरच त्याकाळी जलसाकारांची गाठ पडली. आंबेडकरी आंदोलन खेड्यापाड्यापर्यंत येऊ लागलेले. जलसाकार हे त्याचे सूत्रधार. या जलश्यांमुळे जनजागरण होत होते. महार मंडळी आपली येसकरपाळी, बलुते मागणं, कातडी फाडणं असे धंदे सोडत होती. कात टाकल्यासारखा हा समाज सतेज होत होता. जो कुणी बलुत मागेल किंवा कातडं फाडेल त्याची हुक्का गुडगुडी बंद. कधी झाडाला बांधून त्याच्या तोंडाला काळं फासलं जायचं, किंवा जेवणाच्या पंगतीतून उठवणं असे प्रकार सर्रास होत. एखादे गळू कापावे तशी ती यशस्वी शस्त्रक्रिया होती. हा समाज पेंढीसारखा आवळला जात होता. त्याच्यात स्वाभिमानाचे पाणी सळसळू लागले होते. म्हाराचं प्वार बिश्श्या लय हूश्यार ! साऱ्या जगात असं न्हाय होनार ! आरं बघ बघ ! अशा धाटणीची जलसाकाराची गाणी जिभेवर खेळत असायची.

तमाशाच्या ढंगातील पण वेगळा आशय असणारी गीतरचना मी ह्या काळात ऐकली. जो वग पाहिला तो काही परंपरागत राजाराणी वगासारखा नव्हता. भोवताली पसरलेल्या दुःखाचे पदर तो वग उलगडतो आहे याचे नवे दर्शन होऊ लागले. तो सारा प्रकार मी देहभान विसरुन पहात आलो.

आमचा जिल्हा एकेकाळी कम्युनिष्ट चळवळीने व्यापलेला. साऱ्या जिल्ह्याभर कम्युनिष्ट कार्यकर्त्यांची धरपकड. या गावाने कम्युनिष्टांना आश्रय दिला असे सरकारला समजले तर साऱ्या गावाकडून सामुदायिक दंड वसूल केला जायचा. आपले गाव जंगलाला लागून. त्यामुळे तेथे कार्यकर्त्यांची लपन. महारवाडा–मांगवाडा येथून त्यांना भाकरी चोरून लपून जायच्या. अशाच एका रात्री मारुती देवळापुढे गॅसबत्तीच्या उजेडात आपण अण्णाभाऊ साठे यांचा 'अकलेची गोष्ट' हा वग ऐकला. पोलीस केव्हाही येतील आणि कलाकारानी धरपकड होईल अशी भोवताची कुजबुज. ह्या कलाकारांनी सरकारचं काय घोडं मारलंय हे कळायचं नाही. रात्रभर वग रंगात गेला. 'दौलतीच्या राजा–उठून सरज्या, हाक दे शेजाऱ्याला रे', शिवारी चला', 'धरतीची आम्ही लेकरे भाग्यवान' अशी गाणी वेगळीच जाणीव देऊन गेली. त्या काळी बहुजन समाजाच्या रक्तात रुजलेली ही गाणी. शब्द हे क्रांतिकारक असू शकतात, शब्दांनी सत्ताही डळमळते, हा नवा शोध लागला.

चवथीनंतर गावापासून तीन मैलावर तालुक्याच्या गावी शिकण्यास जाऊ लागलो. वडिलांचे छत्र गेलेले. आई काबाडकष्ट करून तळहाताच्या फोडासारखी जपते आहे. शहरात मी बदलत चाललो आहे. श्रीमंत मुलांचा सहवास, त्यांच्यासारखे इस्त्रीचे कपडे वापरतोय. आईच्या कष्टावर. शुद्ध बोलण्याकरिता धडपडतोय. नाटकात कामे करतोय. बाजाराच्या दिवशी आई मोळी घेऊन विकावयास यायची, समोरून रस्त्याने ती येत आहे. आपल्या बरोबर तर श्रीमतांची पोरे. आपण तोंड फिरवून आईला ओळख देत नाही. आपल्यात दुभंगलेपणा येत चाललंय, टेरिलीन शर्टातील आपले हे दुभंगलेपण आजही संपलेले नाही.

गावी गेलो तर आईचे कष्ट पहावत नसायचे. पहाटे आईच्या

जात्यावरील ओव्यांनी जाग यायची. त्यातील शब्दांनी मी खूपच अस्वस्थ. गाण्याच्या लयीत आपल्या डोळ्यातून नकळत धारा. शब्द आज आठवत नाहीत. पण त्याचा भावार्थ आजही अंगावर तेजाब शिडकावा असा !

भावाच्या विहिरीला पाणी लागत नाही अशा वेळी बहीण भावाला भेटायला येते. नरबळी दिला म्हणजे विहिरीला पाणी लागेल ह्या खुळचट कल्पनेला बळी पडून भाऊ पत्नीशी संधान बांधतो व बहिणीला दोघे विहिरीत लोटून देतात. अशा वेळी बहीण गाते आहे. पायाच्या नखापासून तर डोईच्या केसापर्यंत पाणी जसे चढत जाते तशी गाण्याची लय वाढते. भावाच्या विहिरीला पाणी लागावे या हेतूने ती खुषीने आत्मसमर्पण करते. का कुणास ठाऊक त्या लहान वयातही विहिरीत लोटलेल्या बाईच्या ठायी मला माझी 'आई' दिसायची. ह्या गाण्याचा विचार करू लागतो तेव्हा सारा दलित समाज बाईच्या ठायी दिसू लागलाय. 'दलित' ह्या शब्दाचे व्यापकत्वही माझ्या ध्यानी येऊ लागते. गावकुसाबाहेरच्या जाती, भूमिहीन शेतमजूर, आदिवासी असा मोठा कॅनव्हास 'दलित' शब्दापाठीमागे जाणवतोय. हा दडपलेला समूह खऱ्या अर्थाने क्रांतिप्रवण झाला तर आपल्या स्वप्नात तरळणारे देशाचे टांगते चित्र साकार होईल याची जाणीव प्रखर होऊ लागते. ह्यांच्या श्रमावर, रक्तावर, घामावर, सुपर–स्ट्रक्चर उभे आहे. त्यांची अवस्था म्हणजे विहिरीत लोटलेल्या बाईसारखी आहे हे कळू लागते. मी हादरला जातो.

शाळेत पुस्तकाशी संग जडला. तुकाराम–ज्ञानेश्वर यांच्या अभ्यासक्रमातील धड्यातून तुरळक ओळख लागली. केशवसुत–कुसुमाग्रज हे त्या काळातले माझे आवडते कवी. एकांतात तारस्वरात त्यांच्या कविता मी गायचो. त्यांच्यातील पुरोगामी विचार आवडायचा. पण मी जे जीवन जगत होतो, त्याचे पुसटसे दर्शन त्यात नव्हते. रोकडा

उपदेश करावा तशा त्या कविता वाटत. रामायण–महाभारतातील गोष्टी याच वयात कानावर पडल्या.

महारवाड्यात उम्या आजा नावाचा केस पिकलेला म्हातारा होता. मुक्या बायकोबरोबर पडक्या घरात तो रहात असे. अडल्या नाडल्यांना गंडा दोरा दे, भविष्य बघ, हा त्याचा धंदा. त्याने निळावंती वाचलीय, पशुपक्षांची भाषा त्याला समजतेय, असा भोवताली प्रवाद. हे सारं होतं तरी त्याला सारे 'शकूनी मामा' म्हणत. एकदा निळावंतीबद्दल सहज विचारलं तर त्याने चांगलं चापलं. पोरासोरांचं हे काम नाही. वाचताना पाच फडांचा नाग येतो. भुतंखेतं नाचतात. तो साऱ्यांना असाच टोलवायचा. त्याच्या घरी प्रथम पिवळ्या कागदातील पोथ्या पाहिल्या. वाचायला खूप उर्मी यायची. पण तो हात लावू देत नसे. कार्तिक महिन्यात उम्या आज्याचे ग्रंथांवर निरुपण असायचे. ग्रंथ वाचणारा सवर्ण देवळात आणि उम्या आजा उंबऱ्याबाहेर असा प्रकार. असा उडत उडत ह्या ग्रंथांशी आधीचा परिचय.

पुढे कॉलेजच्या पातळीवर ह्या ग्रंथांशी सलगी झाली तेव्हा वेगळेच प्रश्न चक्रीवादळासारखे मनात उठले. शंबूक, कर्ण, एकलव्य, सीता, द्रोपदी यांचा आक्रोश नुसता ऐकू येऊ लागला. क्रौंच पक्षाची हत्या पाहून विव्हळणारा वाल्मिकी. त्याने रामराज्याची फक्त स्तुती का गायली ? त्याचा तर जन्म गावकुसाबाहेर झाला ? जेथे त्याचा जन्म झाला त्या जीवनाला त्याने स्पर्श का केला नाही. एवढा मोठा प्रतिभावान कवी, त्याच्याच रक्ताचा शंबूक आतून बाहेरून संतापाने पेटून उठला. रामराज्याचा हिमकडा त्याच्यावर कोसळला. अशा वेळी हा अन्याय, अत्याचार वेशीवर टांगणारा वाल्मिकीने एकही श्लोक का रचला नाही ? असे प्रश्न सुचू लागले.

तुकाराम, ज्ञानेश्वर, रामदास यांच्या बाबतीही थोडे फार असेच झाले. लहानपण देगा देवा । मुंगी साखरेचा रवा । हा अभंग वेगळे

दर्शन देऊन गेला. मुंगीला साखरेचा रवा सहज मिळेल, पण जित्या जागत्या माणसाला पाण्याचा घोट मिळणार नाही असा हा देश ! संतांनी आपल्या जाणिवेचे झाड केव्हाच हलविले नाही. स्त्रिया, शूद्र, आणि वेश्या यांच्याबद्दल त्यांचे अतिशय हिणकस उद्‌गार. हे सारं वाचलं म्हणजे कानात शिश्याचा तप्त रस ओतलाय असे वाटले. या संतांनी काही चांगले सांगितले असेल हे पहाण्याचं भान राहिले नाही. कवितेकडे जाण्याचा हा जवळचा मार्ग निष्ठुरतेने बंद केला.

हायस्कूलमधील उच्चवर्णीय मुले आणि माझ्यात परंपरागत जाणिवेच्या पातळीवर संघर्ष घडत होता. त्याची कारणेही तशीच होती. उच्चवर्णीयांनी चालवलेल्या हायस्कूलमध्ये जसा मी शिकत होतो. तसा दलित विद्यार्थ्यांकरता चालवलेल्या वसतीगृहात रहात होतो, तेथे विद्यार्थ्यात महार, मांग, चांभार, ढोर, कोळी असा भरणा होता. प्रत्येक गावातील मुलगा म्हणजे अनुभवाचा नुस्ता अर्क होता. जाती जातीतील फटी येथेच लक्षात आल्या. हा घटक एकसंध क्वचितच व्हायचा. हरिजन दिन सप्ताह खुळ वाटायचे. हॉटेलात जाऊन चहा पिणे किंवा मंदिरात प्रवेश यामुळे आमची अस्वस्थ मने शांत व्हायची नाहीत. भारतीय संस्कृतीची आम्ही टवाळी करायचो, सारी व्यवस्था बदलावी असे आम्हाला वाटायचे. हे परिवर्तन नेमके कशामुळे घडत होते !

वसतीगृहात वेगवेगळ्या विषयावर सतत चर्चा घडे. देव आहे की नाही या कल्पनेवर सरळ दोन फड उभे रहात. आंबेडकरांचे जळजळीत अग्रलेख असलेले 'जनता' पत्र नियमित येत असे. शूद्र मुळचे कोण ? हे आंबेडकरांचे पुस्तक त्याकाळी वाचलेले. सरपण फोडतात तसे गावाबाहेर फोडलेले ही 'ब्रोकेन मेन' ची थियरी त्याच काळात मनावर बिंबलेली. माझ्यातील राखेखालील अंगार नकळत फुलत होता.

वसतीगृहाचे संचालक आजचे मंत्री श्री. रूपवते होते. ते केव्हा केव्हा वसतीगृहात यायचे. मुलांचे करमणुकीचे कार्यक्रम होत. त्यात तेही गायचे. त्यांचा आवाज सुरेख. ढोलकी छान वाजवायचे. स्वतःची रचना ते गात :

कार्य करा रे तरुणांनो
सत्याचा मार्ग धरा रे

तेव्हापासून आपल्याला प्रश्न पडायचा 'खरंच सत्याचा मार्ग कोणता असेल ?'

वसतीगृहात लोककवी वामन कर्डक येत. हा खरा मैदानातला कवी. हजारो श्रोत्यांना मंत्रमुग्ध करण्याची याची हातोटी विलक्षण. गावात त्यांचे जाहीर कार्यक्रम होत. ते येत तेव्हा सोबतीला साथीदार आणत नसत. साथीदारांची जागा आम्ही काही मुले घ्यायचो. साधीसुधी रचना. पण हा कवी कधी हसवतो आहे, रडवतो आहे, तर कधी संघर्षाला उभे करतो आहे. हे त्याच्या शब्दातील सामर्थ्य पाहून आम्ही दिपून जायचो. 'आम्ही तुफानातले दिवे। वादळ वारा न आम्हा शिवे।' अशी रचना त्यांच्या तोंडातून ऐकली म्हणजे आजही मी थरारून जातो.

आणि एका क्षणी झपाटल्यासारखे मी त्यांचे अनुकरण करू लागलो. ती सारी प्रचारी गीते होती. त्यात यमकांची रेलचेल, सिनेमांच्या गाण्याचा ढंग. दर शनिवारी गच्चीवर आमची मैफल बसायची. साथीला अर्थात डबे. आपण रचलेली गाणी कुणीतरी गातात हा अनुभव थ्रिलचा वाटला. पुढे या गाण्याचा उपयोग वसतीगृहाकरता धान्य, वर्गणी जमविण्याकरता झाला. सुट्टी पडली म्हणजे सारी मुले घराच्या ओढीने गावाकडे पंख लावून जात. मला तसे घर नव्हते. वसतीगृहाच्या भाकरी भाजण्याकरता आईही माझ्या सोबत

आणलेली होती. सुट्टी पडली म्हणजे गावी जायचे तर मग खायचे काय हा प्रश्न होताच. अशा वेळी वसतीगृहाच्या सुपरिटेन्डबरोबर आम्ही गावोगाव भटकायचो. एखाद्या गावात गेलो म्हणजे चावडीपुढे मी गायचो. मग कोणी पायल्या दोन पायल्या मदत देत. ह्या गाण्याचा असा चांगला उपयोग होईल हे मात्र गीते रचतांना माझ्या लक्षात आलेले नव्हते. पुढे बराच काळ अशी गीते रचावयाची सवय गेली नाही. आता पार्टी पेपरमध्ये माझी गीते यावयाला लागली. स्टेजवर पुढारी बोलला म्हणजे ते गीतात उतरवणे अशी कारागिरी माझ्याकडे आली. चळवळीचा एवढा सोशल फोर्स होता की येथे जन्माबरोबरच पक्षाचे कार्ड मिळत असे.

एस. एस. सी. पास झाल्यानंतर मी नोकरीच्या शोधात मुंबईस आलो. मुंबईसारखी मोहनगरी तशी मला नवी नव्हती. रहाण्याची अडचण. दहा बाय बाराच्या खोलीत पोटभाडोत्री म्हणून कामाठीपुऱ्यासारख्या स्लम विभागात माझं बिऱ्हाड बाजलं. भोवताली वेश्यांची वस्ती. गटारीबरोबरच शेणातील किड्यांसारखं माणसाचं जीवन. हे सारं काही प्रारब्धामुळे माझ्या वाट्याला आलं नाही. याचा बोलविता धनी माझ्या ध्यानी येऊ लागलेला. काहींना उंच हवेल्या आणि आपल्याला मात्र नरकाचे जीवन. नसानसातून संतापाचे लोट वाहयचे.

शिकण्यापेक्षा पोट जाळणे महत्त्वाचे. नोकरीची बिगार टाकता टाकता सकाळच्या कॉलेजला जात होतो. कथा कादंबऱ्यात वाचलेले रोमँटिक जीवन काही वाट्याला येत नाही. मेघदूतातील शृंगाराने रोमांचित झालो नाही. तारुण्य सुलभ भावना कोळपून गेल्या. धावत पळत सकाळचं कॉलेज, वटवाघळासारखं लोकलच्या दांड्याला लटकून मस्टरवरचा लाल क्रॉस वाचवणं. नोकरीही मोठी तऱ्हेवाईक. बापजाद्याने ज्या धंद्याला लाथ मारली तोच धंदा पुढ्यात हजर.

नोकरी सोडायची म्हणजे चौरस्त्यावरची का माती पोटात ढकलायची ? परळ येथील व्हेटरनरी कॉलेजात ॲनॉटमी खात्यात नोकरी. क्लार्क-कम-लॅबोरटरी असिस्टंट असा आपला लांबलचक हुद्दा. येथे जनावरांची चिरफाड व्हायची. जनावरं सड़ नये म्हणून त्यांच्या नसातून अल्कोहोल भरण्याचे माझें काम. हाताखाली क्लास-फोरही अस्पृश्य. हळूहळू आपल्या चेहऱ्यावरचे हसू लोपत चाललेले. क्रांतीच्या घोषणेची दमेकऱ्यासारखी उभळ यायची. मुडदेफरासांनी उकरलेल्या मातीसारखी उलथा पालथ व्हावी असे वाटायचे. राल्फ एलिसन ह्या अमेरिकेतील निग्रो लेखकाच्या जीवनातला प्रसंग आठवतोय. इन्व्हिझिबल मॅन नावाची दाहक कादंबरी त्यांनी लिहिलेली. उमेदीच्या काळात न्यूयॉर्क येथे रंगाच्या कारखान्यात तो कामाला. त्याचे काम म्हणजे पांढरा रंग असलेल्या बादलीत काळ्या रंगाचे थेंब टाकणे. हे मिश्रण इतके ढवळणे की काळ्या रंगाचा थांगपत्ता लागू नये. निग्रोंना अदृश्य करणे, त्यांची दखल न घेणे, असेच त्याला तीव्रतेने वाटले. तसेच थोडेफार आपले झाले. हुकला लावलेल्या कलेवरासारखे माझेही आयुष्य टांगले आहे. मी ह्या अनुभवाचा काटेरी क्रूस आजही घेऊन चाललोय. अशा वेळी समाजात नितळ चेहऱ्याने कसे वापरावे हा प्रश्न सतावतो आहे.

वादळात वृक्ष उन्मळून पडावा तसे पुढे माझे आयुष्य होते. जीवनाची उभारी संपली. या वेळी आई मातीआड लोटलेली असते. रक्ताची माणसे बेईमान होतात. आपल्या रक्तमासाचा खच करावा तसे होते. माणसाचे मन, आतले, बाहेरचे, वरवरचे, हे गूढ वाटू लागले. हे सारे भौतिक परिस्थितीचे मुखवटे आहेत हे कळायला बरेच पाणी पुलाखालून जावे लागले. आज जसा घटनेचा कार्यकारण भाव उकलत जातो तसे त्या वेळी होऊ शकले नाही. मी भांबावून गेलो. एवढे झाले तरी मी नियतीच्या अगर देवाच्या आहारी गेलो नाही हे विशेषच.

हे सर्व दुःख 'प्लेटॉनिक लव्ह' या कल्पनेपुढे रिचवले जाते. आपली कुणीतरी उंच हवेतील लैला आहे आणि आपण फुटपाथवरचा मजनू आहे होत. ही वृत्ती गळावते. उमरखय्यामच्या रूबाया, माधव ज्युलियन, इंदिरा संत आपलेसे वाटू लागतात. आकाशातील उर्वशीला उद्देशून मी लिहून गेलो.

माझ्या मनाचा कमंडलू
टिप टिप आसू ढाळीत आहे
अस्थिपंजर देहावर (माणूस, ६७)

'कमंडलू' ही प्रतिमा काही माझ्या जीवनातून आली नव्हती. मी नकळत अनुकरण करीत होतो. आपल्या खऱ्या परिस्थितीचा विसर पडावा म्हणून एखाद्याने दारू जवळ करावी तसा तो प्रकार होता. माणूस, रंभा, मेनका, पैंजण, ललना, वाङ्मयशोभा इत्यादि मासिकांतून अशा शृंगारिक विरहाच्या अनेक कविता प्रसिद्ध झालेल्या.

वाट किती पाहू राया
थांबला का दूर देशी
आसवाने भिजे, माझी मुलायम उशी

एकेकाळी प्रसिद्ध झालेल्या कवितांच्या ओळी आज माझ्या वाटत नाहीत. खरच आपल्या प्रेयसीची उशी मुलायम होती का? किती खोटे आपण लिहित असू. माझी प्रेयसी नेमकी कुठे होती? तिचे जीवन कसे होते? खरं सांगायचं म्हणजे अनाथाश्रमात ती शिकत होती. एस. एस. सी. पर्यंत चप्पल कशी असते ह्याची जाणीव तिच्या पायांना नव्हती. बडया सधन माणसाच्या बंगल्याच्या गेटपाशी गॅरेजमध्ये तिचे वडील रहात. एका त्रिकोणी खुराडयात गोधडीवर हाताची उशी करून झोपलेली तिला मी प्रथम पाहिले. मी जे भोगले

त्याच्या दसपटीने तिने जीवन भोगलेले. मी शब्दाचे ढोल बडवतोय, तिने मात्र सारं हुंदक्यात रिचवलेलं.

ही प्रेयसी जशी दिसते तशी कवितेत चितारली तर कविता होणार नाही काय? आपले दैन्य, वस्तीतील शिव्यागाळया, हे सारं लिखाणात आणलं तर माझी किंवा समाजाची बदनामी होते काय? हे सारं कुणी लादलं? वस्तीतील लोकांचा ह्यात दोष किती? जीवनाची सारी दारे बंद झाली म्हणजें करमणूक करण्याची तऱ्हा निराळी होते. सेक्स आणि तोंड येवढेच त्यांचे भांडवल उरते. कलेपासून, संगीतापासून त्यांची फारकत करून त्यांच्या जीवनाला नावे ठेवण्याचा कोणता अधिकार प्रस्थापितांना पोहचतो? असे अनेक प्रश्न गांधीलमाश्यांसारखे डसू लागले.

मनात असा कल्लोळ होता तरी नव्या जाणीवांची कविता मला लिहिता येत नव्हती. अस्वस्थता: वाढत होती. ज्या पद्धतीची कविता प्रसिद्ध होती त्याने माझे समाधान होत नव्हते. मराठीतले मान्यवर कवींचे संग्रह सातत्याने वाचत होतो. मर्ढेकरांना नवकवितेचे शिल्पकार समजतात. पण त्या काळी मर्ढेकरांच्या कवितांनी मला कोणताच धक्का दिला नाही किंवा त्यात वेगळेपणा वाटला नाही. यंत्रयुगाने माणूस जंतूसारखा केला आहे असे जे त्यांना वाटत होते ते यंत्रयुग माझ्यापर्यंत आलेलेच नव्हते. आम्ही तर यंत्रयुगाची वाट पहात होतो. त्याच्यात आमची मुक्ती आहे असे मनोमन वाटत होते. दि. पु. चित्रे यांच्यानंतर आलेली संतप्त पिढी फॉर्मच्या आहारी गेलेली वाटली. प्रतिमांच्या जंजाळात अडकलेली ती केवळ फोफशी कविता आहे, अशी कविता मला लिहिता येणार नाही, असे वाटले. विद्यापीठातून मी मराठी घेऊन बी. ए. किंवा एम. ए. झालो नाही हे बरेच झाले असे वाटले. नाहीतर अशीच प्रतिमांनी सुजलेली फोफशी कविता मी लिहिली असती. मुक्तिबोध, विंदा करंदीकर, कुसुमाग्रज हे कवी

त्यांच्या कवितेतील पुरोगामी विचार म्हणून आवडत होते. पण मी जे जीवन जगतोय त्या जगातील अफाट दुःख यात कोठे आहे हा प्रश्न पडायचा. नारायण सुर्वे यांचा 'ऐसा गा मी ब्रह्म' व 'माझे विद्यापीठ' हे संग्रह येईपर्यंत मी मूक होतो. सुर्व्यांची लिहिण्याची धाटणी, रोखठोक भाषा, नकळत मला खूपसे सांगून गेली. त्यांची 'आई' मला माझ्या आईचे चित्र वाटले.

१९६७ च्या आगेमागे काळ असावा. बाबूराव बागूल आणि डॉ. म. ना. वानखेडे यांची भेट क्रांतिकारक ठरली. बागूल तोपर्यंत मान्यता पावलेले लेखक. 'जेव्हा मी जात चोरली होती' हा त्यांचा कथा संग्रह गाजलेला. त्यांची पहिली भेट आजही आठवतेय. एका इराणी हॉटेलात ते लिहित बसलेले. काळेसावळे, डोळे तेजस्वी. बोलायला लागतात तेव्हा मनाचा ठाव घेतात. कात टाकलेल्या सापासारखी कविता सळसळत बाहेर यावी असे त्यांचे कवितेसंबंधी मत. कवितेला कात टाकलेल्या सापाची उपमा आवडली. साप जसा हाताळावयास कठीण तशीच कविता याची जाणीव तीव्र झाली. दलित समाज खऱ्या अर्थाने क्रांतिकारक समूह का होत नाही हे त्यांच्या चर्चेचे सूत्र. मी नुसता ऐकत होतो. मी घरी गेलो तेव्हा रात्रभर झोप नाही. झपाट्यासारखी मी 'प्रक्षोभ' ही कविता लिहिली. आजवरच्या सर्व कवितांपेक्षा ह्या कवितेचे वेगळेपण माझ्या सहज लक्षात येते. पण ह्या कवितेची गंमत म्हणजे प्रस्थापित मासिकांकडून अनेकदा ती साभार परत आली. पुढे मी ती घनश्याम तळवटकर यांच्या प्रेरणेने सोळा कवींचा जो 'आकार' हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला त्यात समाविष्ट केली. संग्रहाच्या उद्घाटनाच्या वेळी कवी वा. रा. कांत प्रक्षोभची भलावण करतात. तेव्हा कुठे कळते की मी फार काही चुकत नाहीय.

डॉ. म. ना. वानखडे निग्रो वाङ्मयाचे अभ्यासक. माझे आजवर

इंग्रजीचे वाचन तुटपुंजे. त्यांच्या सान्निध्यात निग्रो लेखकांची ओळख होऊ लागली. तिथे प्रा. जनार्दन वाघमारे यांच्याही लेखांचा वाटा आहे. अमेरिकेतील गोरे आणि काळे यांच्यातील सांस्कृतिक द्वंद्व, त्याचप्रमाणे येथेही दलित आणि दलितेवर ह्यात हा विरोधाभास, हे जोपर्यंत चालू आहे तोपर्यंत जाणीवेच्या पातळीवर हा झगडा कायम आहे. हा त्यांचा विचार मनात प्रबळ होतो आहे. निग्रो लेखक धापले अनुभवविश्व सोडून लिहू लागला तर तो थिटा पडतो, हे ते सांगत माझ्या मनात आंदोलन मला 'हार्लेम' सुचते गेली. मीही अनुभवाशी द्रोह केलेला –

आकाशाच्या बाजेवर कितीदा द्रोह केला
रानातला मोड पितळी कुंडीत खुरटून गेला

प्रेयसी आणि प्रियकराच्या प्रतिमांच्या पाठीमागे सामाजिक जाणीव आणि कवी असे हे द्वंद्व, हे केवळ चर्चेमुळेच घडू शकले.

'अस्मितादर्श' या त्रैमासिकाचा उदय मला कवितेच्या बाबतीत पहाट झाल्यासारखा वाटला. प्रा. गंगाधर पानतावणे यांनी अनेक नवे चेहरे उजेडयात आणले. त्यात माझाही एक चेहरा. एका पाठोपाठ एक अशी कविता त्यात येऊ लागली. प्रसिद्धीच्या संदर्भात ही 'कोंडी' फुटली होती. प्रतिष्ठान, किर्लोस्कर, वैखरी, सत्यकथा, आम्ही, मागोवा, ह्यांनी पुढे हात दिला.

बाबुराव बागूल यांच्यामुळे काही नवे मित्र मिळत गेले. सदा कऱ्हाडे, दि. के. बेडेकर, प्र. श्री. नेरुरकर, नारायण सुर्वे, केशव मेश्राम यांच्याशी व्यक्तिशः जवळिक ह्याच काळात झाली. महाराष्ट्र बौद्ध साहित्य सभा, प्रगत साहित्य सभा, ह्या एकाच वेळी साहित्याच्या क्षेत्रात समांतर काम करीत होत्या. दोन्ही संस्थांशी माझे लागेबांधे. माझी वैचारिक घुसळण होत होती. वेळोवेळी झालेल्या वाङ्मयीन

चर्चा माझ्या जाणीवांचा परिघ वाढवीत गेल्या. एक महत्त्वाची चर्चा आज आठवते. प्रगत साहित्य सभेत एकदा चर्चेला तोंड फुटले. विषय होता बुद्ध आणि मार्क्स. सरळ सरळ अटीतटीने दोन फळच्या पडल्या. ह्या चर्चेला दि. के. बेडेकर हजर होते. त्यांनी चर्चेचा समन्वय साधला: एकादा माणूस एकाच वेळी बुद्ध आणि मार्क्स यांच्या तत्त्वज्ञानांचा स्वीकार एका अर्थी करू शकतो. यात विसंगती नाही. आणि मी तसा स्वीकार केला आहे. हे त्यांचे मत मला नवे दर्शन देऊन गेले. परंपरागत पोथीनिष्ठ अशा मार्क्सवाद्यांपेक्षा ते वेगळा विचार करतात हे लक्षात येते. माझ्या मनात जुळणी होते. ह्यापूर्वी मी डॉ. आंबेडकरांचा बुद्ध आणि मार्क्स हा लेख वाचलेला आठवतो. बुद्धाला जे दुःख अभिप्रेत आहे ते दुःख म्हणजे आत्मा, पुनर्जन्म, कर्मवाद यांचे दुःख नसून भोवताली प्रस्थापित वर्गाकडून जी पिळवणूक होते ते दुःख आहे असा लेखातला धागा जोडला जातो. जाणीवेच्या पातळीवर बुद्ध आणि मार्क्स हे दोन दीपस्तंभ सारखेच वाटतात. मी बुद्धाकडे परंपरागत वृत्तीने बघू शकत नाही. मी बुद्धासंबंधी लिहिले आहे:

तुला मी असे कधीच पहात नाही
जेतवनात
डोळे मिटून बसलेला
ध्यानस्थ पद्मासनातला
अथवा
अजंठा वेरूळच्या लेण्यात
दगडी ओठ शिवलेला
शेवटची निद्रा घेत असलेला.
मी तुला पहातो
चालता बोलता

दीन दुबळ्यांच्या
दुःखावर फुंकर घालणारा,
जीवघेण्या काळोखात
हाती मशाल घेत
झोपडी झोपडीकडे जाणारा,
संसर्गजन्य रोगासारख्या
नरडीचा घोट घेणाऱ्या
दुःखाचे
नवे अर्थ सांगणारा.

ह्या लिहिलेल्या कवितेच्या शैलीवरून आठवले. स्वतःचे माध्यम हवे याकरता माझी कविता धडपडत होती. १९६९ या दरम्यान अस्मितादर्शमधून तरूण विद्रोही कवी सुंकात भट्टाचार्य ह्याच्या काही कविता वाचल्या. हा बंगाली कवी. ३६ वर्षे जगलेला. टी. बी. मुळे हा बळी गेला. घणाघाती विचार कवितेत घेऊन येणारा हा कवी थोर वाटला. घनदाट काळोखात विजेचा कल्लोळ व्हावे तसे वाटले. ह्या कवीची विचारांची झेप दूर पल्ल्याची होती. कुणाला खूष करावे म्हणून हा लिहित नव्हता. त्याच्या कवितेतील मनोव्यथा आंतरिक होती. त्याच्या कवितेत शब्दांची नजाकत नाही, प्रतिमांचे अवडंबर नाही किंवा लयीचा हव्यास नाही. मनाशी संवाद करीत ती सरळ भिडते आहे. आता ह्या कवितेला मराठीतला मान्यवर समीक्षक कविता म्हणणार नाही. हे सारे नारे आहेत, ती विधानात्मक आहे, हे आरोप यायचे. हे सर्व जाणवत असतांनासुद्धा भट्टाचार्य आपल्या मनाची पकड घेतो. मी तशा कविता लिहिण्याचा प्रयत्न करतोय. त्याची शैली आणि विचार जवळचे वाटतात. मराठीतल्या कुठल्याही कवीने येवढे अस्वस्थ मला केलेले नाही. त्यांच्या कवितेच्या ह्या काही ओळी :

हे सूर्या
तू आमच्या ओल आलेल्या घराला
उब दे, प्रकाश दे,
उब दे
रस्त्यावरील त्या लहान नग्न मुलाला.
हे सूर्या !
तू आम्हाला उष्णता दे
ऐकिवात आहे की तू अग्निगोलक आहेस
तुझ्याच जवळून उष्णता घेऊन
एक दिवस सारेच आम्ही अग्नीचे लोळ होऊन जाऊ.

कविता लिहिण्यापूर्वी तशी कोणतीही भूमिका मनात नसते. येवढेच काय, कविता घडणार आहे याची पुसटशी जाणीव नसते. एक मात्र खरे की एखादी घटना, एखादे वाक्य किंवा दैनंदिन घटनांचा कार्य-करण भाव ह्यातून मला कविता सुचते. आभाळातून मला केव्हाच कल्पना सुचत नाहीत किंवा माझ्या हातून एखादा देवदूत कविता लिहितो ह्या भाकड कथेवर विश्वास बसत नाही.

संग्रहातील 'पाय' या कवितेचेच बघा. ऑफिसच्या कामाकरिता नंदुरबार येथे मी गेलेलो होतो. फलाटावर असाच रेंगाळत उभा. दोन रूळांच्या मध्ये एक मेहतर झाडलोट करत होता. अशा वेळी त्याचे लक्ष नसतांना धडाडत गाडीचे धूड आले आणि त्याचे पाय खुडले गेले. पुढे प्रवासात बराच काळ तो माझ्या समोरच्या बेंचवर पडलेला. त्याला वाटेला लावताना त्याच्या चिल्यापिल्यांचा आक्रोश. त्याचे तुटलेले पाय पिच्छा पुरवतात. वेदात वाचलेल्या पुरुषसूक्तातील ओळी याद येतात. दलितांना त्यात दिलेली पायाची उपमा आणि हे तुटलेले पाय याचे नाते जुळते. कविता काही लगेच तयार होत नाही.

पुढे सातआठ दिवस पायांचाच विचार. आणि एका कुठल्यातरी क्षणी सारी कविता मनात आकार धरू लागते. ' ज्या पायातून जन्म झाला ते कळचांसारखे खुडलेले पाय '...

असे थोडेफार साऱ्याच कवितेच्या बाबतीत सांगता येईल. उंच हवेली बांधण्यासाठी एखादी झोपडपट्टी उध्वस्त करावी आणि तेथील गोरगरीब माणसे हुसकावून काढावीत, ह्या महानगरातील नेहमीच्या दृष्यातून सिद्धार्थ नगर आकारले. तर वरळीसारख्या दंगलीचा ताजा संदर्भ माझी प्रचंड घुसमट करून गेला. मेलेल्या मनाने मी चाळी-चाळीतून नुस्ता फिरलो. ही अमानुषता थोपवण्यास मी असमर्थ ठरतोय. अशा वेळी ' ब्रोकन मेन ' लिहून होते. तेथे पाहिलेला महार पलटणीतला पाय तुटलेला सैनिक. त्याचा मूक आक्रोश मला ऐकू येतो.

सदा सर्वदा मी ' विद्रोही ' कविता लिहितो असे काही नाही. अंतर्मुख होऊन माझ्या समाजाचे अंतरंग तपासावे वाटते. अशा वेळी ' सभा ' सुचते. ही निवडणूक चालू असते तेव्हा मी साक्षी असतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतर त्यांच्या अनुयायात आलेले अराजक. बौद्ध धम्म घेतलेला. पण त्याचा डॉ. आंबेडकरांनी सांगितलेला नवा संदर्भ लक्षात न घेता. दुकान तेच पण पाटी बदलली हा प्रकार. सांस्कृतिक मने एवढी मागासलेली मी साधा अध्यक्षही निवडणे कठीण. सारा समूह खोटचा प्रतिष्ठेला बळी पडलेला. कोते, स्वार्थी पुढारीपण, शिव्यागाळचा, भांडणे व मारामाऱ्या यांना उत आलेला. देशातील लोकशाहीचेही हेच चित्र पाहिलेले. कवितेला हळूहळू मोठा कॅनव्हॉस मिळतो. जिल्हावाद, प्रांतवाद बोकाळलेला. कवितेच्या शेवटी गरोदर बाईच्या बाळंतपणातून हे अराजक संपणार आहे, नवे नेतृत्व येणार आहे, असा आशावाद.

मराठी वाचक ह्या कवितेचे स्वागत कसे करील सांगता येत नाही. गेली काही वर्षे वेगवेगळचा पातळीवरील श्रोत्यांच्या समूहांपुढे कविता

वाचण्याची संधी मिळाली. त्यामुळे काही अनुमान काढू शकतो. ग्रामीण पातळीवर नवा सुशिक्षित वर्ग मोठ्या संस्थेने येतो आहे. तेथील हायस्कूल–कॉलेजच्या पातळीवर माझी कविता भिडते आहे. महाड येथे झालेल्या साहित्य संमेलनातील कविता–वाचन हा तर न विसरणारा अनुभव. पहिली रात्र, सभा, अशा कविता श्रोत्यांनी डोक्यावर घेतलेल्या. त्याचबरोबर काही निराशाजनकही अनुभव. मराठीचा प्राध्यापक वर्ग नाक मुरडतो आहे; तर पवई येथील आय. आय. टी. च्या विद्यार्थ्यांपुढे ही कविता वाचताना थंड गोळ्यासारखे वाटते आहे. बर्फावर सुरी फिरवावी तसा हा अनुभव.

भारतीय सांस्कृतिक जीवनात ही दरी आहे याची जाणीव पुन्हा प्रकर्षाने येते. हे सांस्कृतिक द्वंद्व नाहीसे करण्याकरता माझी कविता बळी पडली तरी चालेल, या भूमिकेशी मी आलो आहे. मरण या कवितेत मी लिहितो आहे :

धारदार सुळ्यांच्या दरवाजाला
हत्ती जसे चिपा होतात
तसं आपण हसत मरावं.

**दया पवार**

## प्रक्षोभ

पोलादी चौकटी आड
माझ्या मनातला मी
बोलू लागला बंडाची भाषा
दमेकऱ्यासारखी येते केव्हा
क्रांतीच्या घोषणेची उबळ
गतीमान करावे वाटते
गाळात रूतलेले दैन्याचे चाक
हे काही आजचेच नाही
नेभळटपणाचा पाण्याचा हबका
विझवतोय पेटलेला अग्नी
अनाथ आश्रमातील कदान्न
पळीभर घुगऱ्यासाठी
लावलेली लांबच लांब रांग
शौचाला नेणाऱ्या लोटचातूनच
प्यालोय पाण्याबरोबर दुःखाचे कडवट घोट
हात आभाळाला टेकावेत
याच आशेने आईने थापलेल्या
वसतीगृहाच्या भाकरी
विटाळात केलेल्या स्वयंपाकाची
झालेली जिवघेणी विटंबना
त्या वेळीही अशाच मुठी आवळल्या
सरकलेत दिवस कर्तृत्वाची भरारी
लाचारीची झालर मिरवीत

नोकरीपायी केलेली हांजी हांजी
मनूचा शाप म्हणून की काय
ॲनाटमीत झालेली कलेवरांची संगत
बकरी टांगतात तशी
नसानसात टोचलेले
अल्कोहोलातील सडलेले सांगाडे
मीही होतो त्यातलाच एक
टिचभर पोटासाठी नाही आली
नरकातही किळस घृणा
पोलादी चौकटीतला प्रक्षोभ
किंचाळायचा आतल्या आत
मुडदे फरासांनी उकरलेल्या
मातीसारखी व्हावी उलथा पालथ

## आवर्त

वादळी वाऱ्यासारखा घोंगावणारा घंटानाद
पाला पाचोळा खेचला जातो या आवर्तात
माझ्याकरिता सारी दारे सताड उघडी आहेत
मी देवळाबाहेर पाठ करून उभा आहे निर्विकार

० ० ०

कधी काळी देवळातील देवपण डोळाभर व्हावे
हा हव्यास चांदण्यासारखा दाटला होता
मिसरूड वयातील ती काळरात्र आठवता
आजही साऱ्या अंगभर फुटतो काटा
या खांबाच्या नक्षीदार महीरपी...झळाळता कळस
बापजाद्याने डोक्यावर वाहिलेला दगड न दगड
विचारले तर बोलतील मागील क्षण न क्षण
देवाच्या प्रतिष्ठापनेचा दिवस...उसळलेली जत्रा
संबळ सनईच्या तालात लेजमाने धरलेला फेर
उडती शेमले-गांधी टोप्या...उधळलेला गुलाल
मिरवत चाललेला पाठीमागून देवाचा रथ
वयसुलभ उत्कंठतेने मी देवाला सामोरा गेलो
आणि मग...एकच कोलाहल जत्रेत उठला
'रथाला म्हारडा शिवला—हाणा मारा साल्याला'
गावकरी धावले—फरफटत मला मंडपाकडे नेले
देहाची चाळण झाली—रक्त चिळंकाडीने देव भ्याले
चवुतऱ्याच्या थंडगार तुळईला करकचून बांधले

न बुझणारे ओल्या वादीचे आसूड फटके ओढले
प्राण कंठाशी आलेला मी—मला काहीच कळेना
मी असे काय केले—का उगा मला झोडपले
जोहार मायबाप करीत बाप लाचारीने पुढे आला
प्राणाची भीक मागत पदर पांढरीपुढे पसरला
आजही कुठलेही देऊळ पाहिले की ती जखम भळभळते
त्यांच्याच वंशजांची ठायी ठायी प्रचिती येते.

## तुम्ही प्रकाशाचे पुंजके व्हा !

गावकुसाबाहेर उपेक्षित वस्ती
राहुटयांचे दोर ताणले आहेत
धमनी धमनीत असंतोषाचे लोट
संतापाने कधीचे तटतटत आहेत
गावगाडयाची वेठ बिगार झुगारलेला
दस्यूचा अबलख घोडा
खुरा मातीने टोकरीत
दारी केव्हाचा फुरफुरत आहे
कालच्या सारखा आजही
घोडदौड करीत जासूद आला
महारवाडयाच्या चावडीपुढे
त्याने दुःखाला वाचा फोडली
लोकहो !
अमानुषता शिगेला पोहचली आहे
नागभूमीत तुमची अस्मिता डिवचली आहे
कोंब फुटलेल्या हिर्व्यागार झाडासह
कोवळा लुसलुशीत अंत्यज पोर
भडकत्या चितेत बळी देत आहेत
भर हाटात कैक दुःशासन
आयाबहिणींच्या निरेला झोंबत आहेत
अचूक शब्दसंधान करणारा
तुमचा एखादा एकलव्य
आजही त्याचे हात कलम होत आहेत

अजूनही तुम्ही कुणाची वाट बघता !
प्रखर तेजाने तळपणारा सूर्य
केव्हाच अस्तास गेला आहे
ज्या काजव्यांचा तुम्ही जयजयकार केलात
ते केव्हाच निस्तेज झाले आहेत
आता तुम्हीच प्रकाशाचे पुंजके व्हा
अन् क्रांतीचा जयजयकार करा

## ये हेमांगी

ये हेमांगी,
काळचा जांभ कातळाकडे
तुझं पाखरु झेपावतंय
हे नवलच आहे
तुला आहे माहीत मी कोण...कुठला ?
सह्याद्री ओलांडून पहिला येणारा
तुझा आक्रमक वंशज अगस्ती
याने माझ्यातला उफाळणारा
स्वातंत्र्याचा सागर
गावकुसाच्या वळचणीला बांधला.
समूळ उच्चाटनासाठी तुझ्या जन्मेजयाने
नागसत्राच्या यज्ञ–होमात
इंद्राय स्वाहा तक्षकाय स्वाहा म्हणत
विलयाची वाट पहात बसला,
पण माझ्यातला युयुत्सु भूमीपुत्र
हरळीच्या मुळीसारखा चिवट राहिला
गंगा सिंधूच्या प्रवाहात.
वेद–उपनिषदाची हवा भरून
तुझ्या संस्कृतीचे शीड
चातुर्वर्ण्याच्या पाणवठ्यावर स्थिर झाले
अन् मग आम्हा भूमीपुत्रांना
पाण्यावाचून वंचित केले
तुझ्या–माझ्या रक्त संकरातूनच

मनूची अजस्र भिंत कोसळणार आहे
तेंव्हा ये ! हेमांगी ये !
काळाचे आवाहन कवेत घेऊन
एकच पाऊल पुढे ये !
हा सह्याद्रीचा कातळ
युगे युगे मिलनोत्सुक आहे.

# हिरोशिमा

खोल खोल गुहेत
लवलवणारा प्रकाशाचा धागा
वात्सल्याचा हात
फोडतोय टाहो मुक्तीसाठी
मी मात्र दिशाहीन
वरवर हास्याची लाट
तीही गेली पुसून
हिरव्यागार शेवाळात
पायही गेलेत फसून
गळचात घुसमटणारा श्वास
पिंजऱ्यात करतो धडपड
विजलोळाने प्रपात व्हावे
बांधावी अस्तित्वाची तिरडी
अन् व्हावे बेचिराख
हिरोशिमासारखे

## रक्तलाट

कान लावता तुझ्या गर्भार कुशीला
मला सागराची गाज ऐकू येते.
तृप्त देहातून उसळणारीं रक्तलाट
शेवाळात ढुश्या देणारा पेरता सुरूंग
विश्वदर्शनाला आसुसला आहे.
आवळलेल्या मुठी...देत असलेली धडक
मुठीएवढ्या जीवात धगधगता आवेश आहे.
पण तू अशी खिन्न...खिन्न का ?
ऊन–पावसात टकरा देत उभे पडीचे जीणे
झावळाच्या पालात सजवलेली बाळंतशेज
चुलाणावर रटरटा शिजणारी पेज
गावगाड्याची वेठबिगार ओढता ओढता
बलदंड वशिड असलेल्या आपल्या पिढ्या
लोळागोळा होऊन मातीमोल झाल्या
तसा हाही का मातीमोल होणार ?
खरच तस्सा तस्सा मुर्दाड होणार असेल,
तर ग्रीक पुराणातली गोष्ट आठवते का ?
नाळ कापल्या कापल्या धगधगत्या चुलाणावर
याला तावून सुलाखून शेकवून काढू.
इंगळ वेचणारा हा फिनिक्स पक्षी,
बलिष्ठ आकाशाला भिडणार आहे.
तुला मला जे सुख-वैभव, देशाने
कधी वाटचालाच येऊ दिले नाही;
ते सारं सारं पायी खेचून आणणार आहे.

## देह

कमरेला वितभर पटकूर
तेवढीच सोय लाज राखण्याची
ओघळलेली लाळ... सोडलेल्या झिज्या
खराखरा खाजवणारा अनावृत देह
उभा कधीचा आपुल्याच तंद्रीत
काळचाभोर मातीवर मध्येच पसरलेले
हिंस्र श्वापदासारखे खडीचे दांत
तटतटलेली स्तने... ओणवलेली कूस
कुठल्यातरी बेसावध क्षणी
कधी दहशतीने कधी चुचकारून
लावलेले बेवारशी झाड
इथेही गेलेत दिवस अन् काही मास
संभाविताचा बुरखा पांघरून
विश्वामित्राची पोझ घेत
महापुरुष भिनतो तुमच्या–आमच्यात

## सभा

पिंपळ पारावर
मेणबत्तीच्या अंधुक उजेडात
अध्यक्ष–निवडणूक सुरू झाली
एकाच रक्ताचे उभे-आडवे वाडे
रानरेडयासारखे रात्रभर
विचारांशी टकरा देत राहिले.
गवत्याची आई वेणा देत म्हणाली
 – आवं गवत्याच्या बापा
 इथं माझा टाइम भरला
 काडी लावा सभंला–
 – अग गधडे !
 तुझ बाळंतपण निस्तारू
 अध्यक्षपद माझं गेलं तर
 उद्या वार्डात काय करू –
तरातरा म्हातारा गेला
ढग गडगडतो तसा
सभेत गडगडला
 – काय रे कालच्या पोरा !
 उभी हयात राजकारणात गेली
 तुझा जार अजून वाळला का ? –
 –ये बांबलीच्या—खेकसला
जिल्हावाला साथ देत उठला
एकच चालला गदारोळ

कुणाचा कुणाला बसेना मेळ
अध्यक्षपदाच्या शितासाठी
जमली सारी भुतावळ.
हादरला तिथला पिंपळपार
मेणबत्तीचा उजेड विझला
सारा ... सारा अंधकार

पहाटे गवत्याची आई बाळंत झाली
टचाऽहा टचाऽऽहाच्या गजरात
सभा एकदाची कोलमडली.

लॉस एंजल्सवरून तू लिहिलंस--

" इथे भर हाटात, हॉटेलात अवती भवती
इंडियन आणि कुत्ते एकाच मापाने मोजतात
निगर काळे म्हणून शिवी हासडतात
आतल्या आत सहस्त्र इंगळ्या डसतात. "
हे सारं सारं वाचून फाऽऽर बरं वाटलं
या देशात पिढ्यान् पिढ्या आम्ही जें भोगलं
ते थोडंसं तुझ्याही वाट्याला आलं...

## हे महाकवे

बा वाल्मिकी
रामराज्याची तू स्तुती गावी
कारण तू कवींचा महाकवी ?
क्रौंच पक्षाची हत्या पाहून
तुझे कारुणिक मन आक्रंदून उठले
तुझा जन्म झाला गावाबाहेर
उपेक्षित वस्तीत... जिथे दु:खच जन्मले
तिथले विषण्ण चेहरे... काळजीने नांगरलेले
फळाफुलांनी नाही कधी बहरले
मुक्तीसाठी त्यांनी टाहो फोडलेले
ख रच का न ऐकले ?
तुझ्याच रक्ताचा एखादा शंबूक
तटतटून संतापानें पेटून उठला
रामराज्याची स्तुती गाणाऱ्या
हे महाकवे...
तिथेही अमानुषतेचा हिमकडा कोसळला
हे महाकवे
तुला महाकवी तरी कसे म्हणावे
हा अन्याय अत्याचार वेशीवर टांगणारा
एक जरी श्लोक तू रचला असतास...
...तर तुझे नाव काळजावर कोरून ठेवले असते.

## गस्त नसलेली वस्ती

रात्री बेरात्री गस्त नसलेली वस्ती
शोभेला कडीकोंडा
देवदारी दारे सताड उघडी
दुतर्फा फुटपाथला माणसे कलम केलेली
थकली भागलेली
डबक्यात शेवाळासारखी पसरलेली
शहर किती जल्लोषात कोजागिरी खदखदली
चांदण्याची लयलूट
गरवांच्या लयीत भोवंडली
अरे, गल्लीत असा सन्नाटा का ? नाचा गा
साला खालीपीली निंद खराब केली
शहामृगाने पुन्हा गोधडीत मान खुपसली

## खांदा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
20928

चेहरा ओंजळीत घेऊन
तू म्हणालीस :
—राजा,
तुझ्या पिठात माझे मीठ रे—
पदर खोचून घराबाहेर पडलीस.
छातीवर दगड ठेवून
चिवचिवणारी आपली पिल्ले
शेजारणीच्या ओटीवर ठेवलीस.
अग,
मी जिवंत असताना
बाहेरचा ऊन-वारा साहिला
कवितेत आभाळ पेलवणारा खांदा
इथे सखे लुळा पडला.

## पहिली रात्र

वाजत गाजत परणून तू माझ्या घरा आली
तुला पहाया चाळीचाळीतून माणसे डोकावली
आहे ना अजब नगरी, एका खोलीत तीन चुली
तिच्या रित्या कोपऱ्यात संसाराची आरास मांडली
म्हणालीस ' किती हे गचपान, रात्रीला झोपावे रे कसे?'
—सये, इथेही रुळशील, पाण्यात मासे झोप घेतात तैसे—
भोवताली निजानिज होता, कानी सनई ग वाजली
झाकपाक करुनी तू येता मला स्वर्गपरी भासली
ठेवणीच्या जुनेराची लगबगीने भिंत तू बांधली
निर्मी दोन जिवांचे जग, रोपट्रीक तुला आठवली
अंधारी घाईगर्दीत बिलगता, फळी खाटेची कुरकुरली
कुणी खाकरले मधे, कुणाला हासण्याची उभळ आली

तू जशी जवळ ग आली तशी दूर... दूर सरकली
सारी रात सुनी सुनी, आसू ढाळीत मालवली

## मरण

मागील पाणी गढूळ आलं
पुढल्या पाण्यानं किती जपावं
हां हां म्हणता वणवा आला
एका झाडानं किती टकरावं
सणाणत गोळ्या चालून आल्या
पंखानं आभाळ किती तोलावं
धारदार सुळयांच्या दरवाजाला
हत्ती जसे चिपा होतात
तसे आपण हसत मरावं

आज विषाद वाटतो कशा वागविल्या मणामणाच्या बेड्या
गाळात हत्तींचा कळप रुतावा तशा ध्येय–आकांक्षा रुतलेल्या
शिळेखाली हात होता तरी नाही फोडला हंबरडा
किती जन्माची कैद कुणी निर्मिला हा कोंडवाडा
कैद्यासारखी ताटवाटी आपणच आपली लखलखीत करावी
नेहमीचा आपला परित्यक्त कोपरा वर तलवार टांगलेली
पुढे सरकावे तर एकच गहजब, याने स्वयंपाक खोली बाटवली
आतल्या आत घुसमटायचे–आपण कोण ? काय आपला गुन्हा
आलो कोठून ? अश्मयुगाच्या घनदाट काळोखात बघावे पुन्हा पुन्हा
खरच कशाला झाली पुस्तकांशी ओळख बरा ओहळाचा गोटा
गावची गुरे वळली असती, असल्या इंगळ्या डसल्या नसत्या

## गांधी जन्मशताब्दी

– ये भडविच्या खाली बस –
तो हिरमुसला अन् खाली बसला
गांधी जन्मशताब्दीला
धूर ओकणारी चिमणी
क्षणभर थांबली
खात्याखात्यात अऱ्या झाला
धडधड करणारी यंत्रचाके
चाहूल घेऊ लागली
कपाळावरचा घाम निपटीत
धवधवा कामगार एक झाले
– ते आले...ते आले –
टाचा उंचावत गेटकडे पाहू लागले
कुस्तीगीर हौदात उतरावेत
तसे दमगीर पावले टाकीत
पुढारी स्टेजवर आले
– बंधूहो,
        राष्ट्रपिता म्हणायचे
        हरिजन देवाची लेकरे
        उगवत्या सूर्यबिंबासारखे
        त्यांचेही रक्त लाल लाल –
टाळ्यांच्या गजरात भाषण संपले
राष्ट्रपित्याच्या फोटोचे अनावरण झाले
– कांबळे हार आण –

सुताच्या लडीचे हार धावून आले
गंडमाळासारखे गळ्यात रुतून बसले
– कांबळे प्रसाद वाट –
कांबळे पुढे सरसावला
सभेत मरहाठी आवाज घुमला
– ये भडविच्या, अरे प्रसाद बाटवला –
विजेचा शॉक बसावा
तसे अनेक हात आखडले
गांधींच्या जयजयकारात
खात्याखात्यात कामगार परतले
पुन्हा चिमणी धूर ओकू लागली
यंत्रचाके धडधडली
सांज झाली, दिशा क्षणात काळवंडली

## खुळखुळ्याची काठी

हमरस्त्यावर येता येत नसेल तर
चुळभर पाण्यात जीव दे रे
वेशीवेशीवर ज्यांनी मरणाचे तोरण
हसत बांधले, त्यांचा तू वारस ना रे
मदमस्त दसऱ्याला रेडा
गाफिल क्षणी जेव्हा सुटला
या बुरुजाबुरुजावर त्याच्या
रक्तामासाचा खच पडला
शहरातील वास्तुवास्तुने
उसळी मारुन गरम वहाणाऱ्या रक्ताने
आपली अघोरी तहान भागवली
– ये माझ्या पुता, तू असा षंढ कसा
चुलीत गोवऱ्या खुपशीत
खुडूक कोंबडीसारखा
खुराड्यात पिसे गाळीत बसलास !
आता तर तुझी अब्रू चव्हाट्यावर आली
वस्त्रहरण केलेली खुळखुळ्याची काठी
हाटाहाटात नागवली
आता तरी पुढे हो
नागवलेल्या काठीला
फाडून लाव आभाळतुकडा

## रक्तात पेरून गेलेला...

तोंडात कचकचीत शिवी यावी हा काही गुन्हा नाही
खाचरात संस्कृतीचे बेण कधी कुणी लावलेच नाही.
संस्कृतीच्या ठेकेदारांनी शेर–पासरीने देशाचा लिलाव केला
चिंदकातील हातांनी शेजेंची बाईल देऊन असा द्रोह केला नाही.
खोपटाखोपटातील उघडा–नागडा संसार, तुम्हाला का किळस यावी
काचेच्या महालात पायाखाली पापांचे जळीत पाहिले का नाही.
देश, धर्म आणि देव फडफडणारी ही तुमची बुजगावणी
अक्कल हुशारीनें रचलेत सापळे, बोला माणूस चिरडला का नाही.
आमच्यात एखादा बंडवाला जन्मला
तर तो काळोखाचा कैदी हिणवता
रक्तात पेरून गेलेला प्रकाशाची रेघ तुम्हाला अजून
दिसली का नाही

## वस्ती

मी अस्थमाच्या रोग्यासारखा अस्वस्थ आहे
विमनस्क मन:स्थितीत गारगोटी नजर
राडार होऊन भोवताली फिरत आहे
सारं सारं तसंच आहे
वरची आळी...खालची आळी
पिढ्यान पिढ्या पडलेली फळी
किनाऱ्याला पाणलोटाने कचरा लोटावा
तशी गावाबाहेर लोटलेली वस्ती
पडलेली खिंडारे...दुभंगलेले वासे
पाणझडीने पाख्यावरून गळालेली कौले
ऊन खात पारावर खरारा खाजवणाऱ्या पाठी
गंजलेल्या पोलादी कांबेची खुरडत चाललेली हाडे
पोटरीवर कणीस यावे अन् पाऊस जावा
तशी खुरटलेली तरणीबांड पोरे
साऱ्यांची प्रकर्णे झेडपीत भिजत आहेत
हात ओला करावा तेव्हा कुठे पाय फुटत आहेत
परीटघडीची जीप कालपरवा गच्कन थांबली
जिवाच्या आकांताने चाकाखालची कोंबडी फडफडली
पिंडाला कावळा शिवतात तसे 'ते' वस्तीला शिवले
हरीचे जन दु:खी कसे आर्ततेने कळवळले
गळ्यात गळा घालून भराभर स्नॅप खेचले
आले तसे 'अभिसरण व्हावे कसे' परिसंवादास परतले

## हार्लेम

तू कितीही झिडकारले तरी तुझ्याकडे येतो
माझ्या रक्तातील आवाज तुझ्या श्वासात गवसतो
तशी तू साधीसुधी, जुनेरात माखलेली
वादळात तू उभी, उन्मळून न पडलेली
काळ किती ग निष्ठुर, हार्लेमसारखे तुडवले
मला वाटे मीच भोगले, तू हुंदक्यात रिचवले
आकाशाच्या बाजेवर तसा मी कितीदा द्रोह केला
रानातला मोड पितळी कुंडीत खुरटून गेला
जाऊन जाणार कुठे, तुझ्या पायाशीच मरण
तुझ्याच बांगड्या पिचतील जळताना माझे सरण

## टरीलीन शर्टातला मी !

टेरीलीन शर्टातला मी
जरासंधासारखा दुभंगलेला
भुतावळीला घास पहिला
तसा दोन दिशेला फेकलेला
दहा ते पाच... ...
पायाखाली मखमली गालीचा
एअरकंडिशनच्या काचेरी कुपीत
हवा कापीत जाणारा पंखा
हॅलो ! हौ आर यू
(हिला मी कसं सांगू)
लालचुटुक ओठात टिकटिक
'अय्या, आम्ही फ्रीज घेतलं'
'उद्या हे किनई स्कूटर घेणार'
चाललेल्या बँक बॅलन्सच्या गप्पा
(मी त्यात असून नसल्यासारखा)
जेलखान्याचे पाचला टोल पडनात
ही का घरा जाण्याची सूचना !
कुठे आहे आपले घर !
शेणात किडे वळवळतात
तसे आपल्या वस्तीचे गुहाजीवन
'तुह्या आईला तुहे'
चौकात आपल्या आईचा
असा उडालेला बोजवारा

बेडकासारखे गटारगंगा उल्लंघीत
टेरीलीन शर्टाला मी
बुटक्या घरात खूपच बुटका होतो
' उद्याच्या सूर्या उगव उगव !'
गात अश्मयुगाच्या गोधडीत
स्वतःला गाडून घेतो

## संस्कृती

खोपटा खोपटात गुडुप अंधार
भोंगा झाला तरी
चौदा ताळाच्या दामोदरीतून
का बरे प्रकाशाची तिरीप येते ?
काय म्हणता :
त्यांनी प्रकाशाचे परमिट काढले.
शुक शुक्
असे त्यांच्या खिडकीतून डोकावू नका
पलंगाखाली त्यांनी आसरा घेतलाय
पिढयान पिढया चाललेला
भव्य दिव्य संस्कृतीचा
कचकडयाचा खेळ मांडलाय
आता तर ते
कानात कापसाचे बोळे घालतात:
खोपटा खोपटात उडालेला हाहाःकार
उरी फुटलेले हुंदके
शांत जीवनात डिस्टर्ब करतात.

## क्रूस

सागरात हिमखंड पुरून उरावा
तसे हे दुःख
सुळक्या सुळक्याने चालून येतात
आठवणीचे दाहक थेंब...थेंब
अंगानर तेजाब शिडकावा
जाळ जाळ, थरकाप करून जातात.
खांद्यावर आयुष्याचा हा असा क्रूस
कपाळी ' प्रारब्ध ' पाटी ठोकून
तुम्ही शहाजोग हात झटकले
आता भूतकाळाची त्वचा सोलून
नितळ चेहऱ्याने कसे मिरवावे ?

हे महान देशा
किती दिवस चालणार
तुझा पंक्ती–प्रपंच
आम्ही रहातो गावाबाहेर
यात आमचा काय दोष
देशाबाहेर तर रहात नाही ना ?
आमची पंगत नेहमी उशीरा बसते
तीही उकीरड्यावर
' वैष्णव जन तो तेणे कहिये
जो पीर पराई जाने रे '
बांगडी तारसप्तकात गात असते
गावात आकंठ गळाभर
पंगतीवर पंगती उठत असतात
तू आमच्या जवळ येईतो
टोपलीतला शिधा संपलेला असतो
असे नेहमीच होते
सळसळणाऱ्या रक्ताचा पोरगा
संतापाने पेटून बोलू लागतो :
' तुमच्या बापजाद्यांची कमाई का
भोसडीच्यांनो, आमचा नाही वाटा ? '
तांबारलेल्या नजरेनं गाव उलटतो
आणि ताटात माती कालवतो

हे महान देशा
तुला महान तरी कसे म्हणावे
पायाखालचे जळीत न पहाता
निरोसारखा सारंगी वाजवीत
हिमालयाचे गोडवे गातोस

## चिमणी

देवांच्या भाकड कथांचा समुद्र
गढूळलेल्या अपरंपार लाटा
गुडघाभर पाण्यात उभी चिमणी
नाकातोंडात जाते पाणी
कालपरवा शाळेतून ती आली
चिलयाची गोष्ट सांगू लागली
देव येवढे का दुष्ट असतात
चिलयाचे रक्त मांस मागतात
मी ऊरी दुभंगतो
अक्राळ विक्राळ देवांचा जबडा
चिमणीचा का घास घेतात ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
20925
2900 28099
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
20925

## मानिनी

अशीच झिळिमिळी रात होती
दिवे विझू विझू घातले होते
श्रमाने रापलेली आईची बोटे
जावळात मऊसूत पिसे फिरवत होती.
मी चिमणीच्या ढणढणत्या उजेडात
पुस्तकातली ' मानिनी ' ऐकवीत होतो
तेजस्विनी मानिनी ऐकता ऐकता
हाडामासाच्या मानिनीने हुंदका दिला
अश्रूंच्या सरीसरीतून गत जीवनाचा
पट अलगद उलगडला:
अल्कोहोलमधे सदा झिंगलेला बाप
एक दिवस काळीज फुटून मेला
" नंगा आलो ... नंगा जाणार "
हे घोषवाक्य पिढीजात ज्याचे
त्याने आम्हाला उघडयावर टाकले.
कोसळणारे आभाळ सावरण्याची
माझ्या चिमुकल्या हातांना जाण नव्हती
गावगाडयाला जुंपलेली आई
मेलेल्या ढोराला दिलेला खांदा
ती येसकर पाळी ... ते सरवा वेचणं
डोंगरमाथ्यावरून वाहिलेल्या मोळया
उपेक्षितांचेही आम्ही उपेक्षित होतो
हे जीवघेणे दुःख पाहून की काय

गणगोताने दारी उभा केलेला
माझा दुसरा बाप...
वीज कडाडावी तशी मानिनी कडाडली
तेव्हापासून दिशा भयकंपित झाल्या
श्रमानेही मान खाली घातली.

## देव शेंदराचे

तुझे सारेच उजाड झाल्याने
कपाळावर टाका खोदणारे
देव देव्हाऱ्याचे
नदीनाल्यात उधळून दिले

दहा दिशांना दहा तोंडे लावून
बोहडचातल्या सोंगासारखे
गल्लीकुचीत उन्मतपणे नाचणारे
तेहतीस कोटी देव
पुन्हा का जन्माला आले ?

दिवसा ढवळचा मशाली पेटवून
अष्टभुजाने आयुधे परजीत
रक्ताळलेल्या जीभा लपलप करीत
परंपरागत संस्कृतीचे नारे लावले

तू या भुताटकीच्या गावातून
परांगदा होणार म्हणतोस !
अरे, असे पळून कितीसे भागणार
तू कुठेही जाशील, जिथे पाय देशील
तिथे शेंदराच्या देवाला ठेचाळशील

## सुरुंग

‘ सत्यमेव जयते ’
बिरूदावली लावलेल्या तक्तापुढे
झंझावाती वादळासारखा
तूच एकटा
विजेचा लोळ होऊन परजलास.
बाजारबुणग्यांनी एकच हाकाटी पिटली
‘ लोकशाहीच्या डेरेदार वृक्षाला ’
तुझ्यासारखी कडवट फळे लटकली !
‘ अरे, लोकशाहीच्या गप्पा मारणारे हे
जातीची शिडी वापरून
कच्च्याबच्च्या अर्भकांचे
बळी घेऊन वर सरकलेले
हे तर साथीदार उपऱ्यांचे ! ’
तुझ्यामुळे आदिम परंपरेला
सुरुंग लागतो या भीतीने
तुला अंधार कोठडीची सजा फर्मावली
थंडगार तुळईला उन्नत माथा
जाडयाभरडया रोटया... ...
हे तर सारं तुझ्या पाचवीला
आपल्या आईच्या निरेला
हात घालताना
तुझ्या डोळयातील धगधगता अंगार
मला दिसतोय रे

आम्ही केवळ कागदी ठराव
आभाळात भिरकावीत
पतंगासारखी काटछाट करीत बसलो.
बघ, बघ, तुझ्या विजेच्या लोळाने
समाज-पुरुषाचे गोठलेले रक्त
कसे धमनीधमनीतून फुरफुरले
असंख्य एकलव्यांचे छाटलेले आंगठे
पुन्हा सामर्थ्याने फुटू लागले.
अरे तू तर क्रांतीचा महान अग्रदूत
तुझ्या स्वागता
मुठी उंचावित जयघोष निनादले!

## शहर

खोदकाम करतान विसाव्या शतकातले शहर सापडले
कागदासारखे कुणी आपल्या अजस्त्र मुठीत चुरगाळले.

भेलकांडलेली यंत्रचाके, थोटकासारखी गिरणीची धुरांडी
यंत्रयुगाची येवढीच चाहूल, बाकी स्थिती मोहेंजोदारोतली.

हातभर कुठेही खोदा, दगड गोटे मूर्ती शेंदरानी माखलेल्या
काही तोंडाला सोंड फुटलेल्या, काही शेपूट अधांतरी तुटलेल्या.

बरे झाले, या वर्षी म्युझियमचे दालन खूप छान सजले
भुसा भरून धर्म नावाचे सोंग पुढल्या पिढ्यांना दाखवावे.

अरे ही पाटी कसली ' पाणपोई सर्व जातिधर्मांना खुली '
म्हणजे माणसा माणसात का होत्या उच्चनीच उतरंडी !

छान केले, असले शहर मातीत गाडण्याच्या लायकीचे
कसले ते यंत्रयुग, विसाव्या शतकात दर्शन अश्मयुगाचे !

## पाय

साऱ्या देहाच्या अक्षाश रेखांश नसा
प्रचंड पिरॅमिड्स्खाली चिरडल्या गेल्या
जखमेवर मिठाचा खडा चरत जावा
तशा तुमच्या हळुवार फुंकरीने ठसठसल्या
तसा मी एकटा नाही सोबतीला घनघोर अंधार
परंपरागत मुडदे गोठलेले, जीवघेणा नासलेला वास
ज्या पायांतून जन्म झाला ते कळ्यांसारख खुडलेले पाय
सारेच म्हणतात, पिरॅमिड्स सलामत तर पाय पचास
अरे अजून थोडी कळ काढ. कळसाला गिलावा देतात.
तुझ्या नावाचा मागमूस नाही, कुणीतरी फीत कापतात
गंगेच्या कावडी आल्या तर त्या रिचवल्या गाढवाच्या तोंडात
पखाल भरभरून ज्ञानेशाचा रेडा येईल म्हणतात !

## सीमा

सारे रस्ते सुरुंग पेरलेले
कानठळ्या बसविणारा आवाज
डोळ्यात तेल घालून मी
सज्ज, टेहळणीनाक्यावर

पिकावरली टोळधाड हाकारावी
तशी दुष्मनांची फळी फोडली,
हातभर अंतरावर काहींची
कायम कबर बांधली

आता सारा सन्नाटा
चिटपाखरूं नाही सोबतीला
अशा वेळी बंदुकीच्या नळीतून
हलू लागला घरचा देखावा.

नाव सोनूबाई हाती कथलाचा वाळा
लक्तरात लपेटलेला राजवाडा.
खंदकात कसाबसा वाचलेला,
शब्द शब्द काळीज कापीत गेला :

' आपल्या गवत्याने भोंगा होतांच
देवळातला दिवा मालवला;
उभा गाव जन्माचा दावेकरी
भाल्याच्या टोकावर महारवाडा. '

चापावरची आपली बोटे का थरथरली. ?
गच्च अंधार मरणाची भोवळ आली
हे माझ्या देशा – सांग, सांग
कोणत्या माझ्या सीमा ?
तू तर हात घातला काळजाला !

## कोंडा

कोंडा
तसे तुझें जुने खोड, डपल्या–डपल्याचे
वय उतरणीचे, कधी तरी कोसळणारे

ते आज अचानक मुळासकट कोसळले
डोक्याला कफन बांधून
तू काळाराम सत्याग्रहात लढलेला
एखाद्या तीरासारखा मैदानात उतरलेला.

तुझ्या रूपाने वस्तीला इतिहास आठवला
बुद्धम् सरणम् गच्छामि या गजरात
तुझ्या निर्वाणाचा रथ सजला.
— तसा वस्तीचा हा गुण चांगला
तोरणादारी का मरणादारी
हे असे उत्साहाने ओघळतील.
बाकी जिंदगीभर,
एकमेकावर काठचा घालतील.

आजही तसेच झाले
झाडून साऱ्यांनी खाडा केला
जो तो दुःखानें गहिवरलेला
गटागटाने अंत्ययात्रेत मिसळलेला.

मी सहजच तुझ्याकडे पाहिले,
वर्गणी जमवून आणलेली

फुलाफुलांची नक्षीदार चादर पांघरलेली
उन्हाची तिरीप झेलीत कुणी तरी
तुझ्यावर छत्री धरलेली

का कुणास ठाऊक
करड्या मिशीतून तू हासलास
नेहमीसारखा टाळी द्यायचास
पण रस्सीने चांगलाच जखडलास.

अंत्ययात्रा हमरस्त्यावर येता
वरल्या आळीने उघडल्या खिडक्या दारे
‘ अहो, पाहिलंत का
रेशनच्या गोण्या वाहणारा
बिचारा कोंडा मेला ’

‘ मम्मी, तोच ना गा हा
पाणी वरून वाढायची याला
ओंजळीने कसा घटाघटा प्यायचा ’

‘ चल, आत हो–तोंड पाहू नये ’
पटापट बंद झाली खिडक्या दारे

जथा जसा स्मशानाकडे सरकला
पुन्हा बुद्धम् सरणम्‌चा गजर घुमला

आता स्मशानात भाषणाची चढाओढ लागलेली
‘ कोंडा आमच्या जिल्ह्यातला ’ जिभेला रसवंती फुटलेली

भाषणाच्या चक्री वादळात तू चांगलाच भोवंडलेला
म्हणतोस ' पोरा–जरा जाऊन शेकतो, आयुष्यभर गारठलेला '
असे म्हणून तरातरा पेटत्या सरणाकडे चालू लागलेला

भाषणांची तबकडी चालूच ' कोंडा किती किती महान
काळाराम सत्याग्रहात लढलेला '

## सिद्धार्थ नगर

हे सिद्धार्था,
तुझ्या नावाच्या नगरीला
या विसाव्या शतकात
सत्तेचा जुल्मी नांगर लागलाय
झोपडी न झोपडी
कशी खडयासारखी उन्मळ्न पडतेय
तुझे नाव असलेली पत्र्याची पाटी
त्यावर पोलीसांची व्हॅन सरकून गेली
खोपटा खोपटातील चटई–चिनपाट
सतरा पिढयांची भली कमाई
दंडुक्या दंडुक्याने विस्कटलेली
उघडी नागडी चिल्यापिल्यांची पाटी
हाहाःकार करीत रस्त्यावर आली
–आवं, दिल्लीवाल्या बाईला हाकी द्या –
–अरे, कुणी तरी मंत्र्याला फोन करा–
–अहो पाहिलत का, किती छान वाटतय
आपल्या ब्लॉकपुढला नरक चाललाय
असेच उभे आडवे तणाव हवेत उठले
बघता बघता भोवतालचे मैदान मोकळे झाले
तिकडे एअरकंडिशनच्या काचेरी कुपीत
सत्तेने तीन माकडांची पोज घेतलीय
कुणी विचारले तर साहेब गावाला गेलेत
असे निरोप पीएकडे ठेवून दिलेत

हे सिद्धार्था, तुला समजले का रे
चंबळखोऱ्यात दरोडेखोरांच्या
हृदय परिवर्तनाची प्रक्रिया चाललीय
अन् इकडे सुसंस्कृत जगात
व्हाइट कॉलरची अमानुषता शिगेला पोचलीय
तुझे आनंद आणि सारीपुत्र
बघ, बघ कुणाच्या वळचणीला लागलेत
—चला, पाच पाच रुपये काढा
सत्तेकडे मोर्चा नेऊ या
तुझ्याच नावावर जगणारे
हे बघ टोळीवाले आले
हे सिद्धार्था;
तू कर्दनकाळ अशा अंगुलीमालास
चळाचळा कापायला लावलेस
आम्ही तुझे छोटे अनुयायी
या अक्राळ विक्राळ अंगुलीमालास
कसे बरे सामोरे जावे
हे सिद्धार्था,
आम्ही जर तुंबळ अराजक केले
तर आम्हाला समजून घे
...आम्हाला समजून घे

## पावसा पावसा तू आलास !

पावसा पावसा तू आलास
सुजलाम सुफलाम करायला
कुणा कुणाची रिकामी कोठारे
धन धान्यानं तुडुंब भरायला

पावसा पावसा तू आलास
उजाड दगडा–धोंड्याच्या देशाला
कुणा कुणाच्या पावलाखाली
हिरवे गार गालिचे पसरायला

पावसा पावसा तू आलास
छप्पर लागे घनघोर गळतीला
चिखलात चिल्यापिल्यांची पाटी
भुकेपोटी लागली वळवळायला

पावसा पावसा तू नव्हतास :
मी आनंदानं उकळलेला
शंभर एकराची मालकीण
टोपपदरी पदर सावरीत
माझ्या कारभारणीपाशी
बसली खडी फोडायला

पावसा पावसा मंग आक्रीत घडलं
तिच्या पिवळ्या धमक तळहातावर
बेंडकावानी फोड टरारलेला

सारा गाव दुःखानं उसासलेला
शहरातून बातमीदार आला
धावत फोटू काढायला

पावसा पावसा, तुला म्हणून सांगतो :
पिढयान् पिढया हाताला घट्टे पडले
' रोजचं मढं त्याला कोण रडं '
असंच का रे वाटलं साऱ्यांना

पावसा पावसा यायचे असेल
तर असा तसा येऊ नकोस
मुसळावानी ये
पुन्हा एकदा जगबुडी होऊ दे

## क्रांती

वारा येईल तशी पाठ फिरवावी
त्याला क्रांती म्हणतात का रे ?
गाफील क्षणी खिंडीत गाठून
ज्यांनी तुझे असे रक्त सांडले
ते तुझ्याच आईच्या दुधावर पोसलेले
एकाच गर्भात नाळाशी जखडलेले

लोखंडी चेन्स, फैटी, खुले रामपुरी
येवढी हवी कशाला तुझ्याकरता सामुग्री.
रक्ताचे शिंपणे खेळणारे ?
भुतासारखी का यांची पावले उलटी असतात,
प्रथम क्रांती आपली बाळे खाते म्हणतात
म्हणून का असा घराकडे मोर्चा वळवतात ?

तू तसा धीराचा : म्हणतोस कसा
ही तर आपलीच नखे, मांजराने बोचकारलेले
टिर्या बडवीत बोळीत पसार झालेले;
अरे, तू म्हणतोस तसे हे भुरटे नाहीत रे
क्रांतीच्या भाषेत भूमीत पापणी न लवता दडलेले

सोन्याच्या काडीने दात कोरणारा, आपला पिढीजात शत्रू
सज्जात पानविडा रंगलेला बेरकी चेहरा पाहिलास ना
कसा आनंदाने उकळू लागलेला
दौलतजादा फेकून इश्काचा रंग लुटणारा
गालातल्या गालात, मिशीला पीळ देत हसतो आहे.

'अरे, हे असेच आपसात लढतील, मातीमोल होतील
इतिहासाच्या पानापानात अनेकदा हेच घडलेले
म्हणून तर आमचे परंपरेचे तक्त शाबूत राहिलेले'
मला तर येशू ख्रिस्ताचे प्रीतीभोजन आठवले
उद्या येशू सुळावर चढणार
त्याचीच ही रंगीत तालीम का रे
महापुरुषासारख्या या नेत्यांनी डबल ब्रेसचे कोट शिवलेले
क्रांतीला गती यावी म्हणून टॅक्सीशिवाय कधी न चाललेले
धीराचे असूनही तसे एकटे दुकटे कधी न दिसणारे
विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर तसा बॉडीगार्डचा ताफा बाळगणारे

पालखीचे पाईक, त्यांचा पाकीट खर्च सांभाळणारे
प्रकाशाच्या झोतात तसे हे मंचावर नटासारखे वावरतात
मागच्यांना शिव्या देत त्यांच्याचसारखे आरत्या ओवाळून घेतात
अज्ञान अंध:काराची आमसुली पुटे चढविलेल्या जत्रेपुढे
विठोबासारखे आपले काळे नक्षीदार पाय पसरतात

तुरुंगाची हवा यांनी चाखलीय म्हणे ! केवढा पराक्रम
फियाटमधील गुलजार मंच्यासारखे यांचे हेच का भांडवल ?
भुभु:कार करीत घोषणांचा नुस्ता धुराळा उडवतात
क्रांती गळचाशी आली म्हणजे सचिवालयाच्या दारात
उंचावलेल्या शेपटचा लाचारीने वळवळतात.

डोकी फोडण्यापेक्षा डोकी रिपेअर करणारी
तुझी धीमी चाल मला आवडते रे
वारा येईल तशी पाठ फिरवावी
त्याला क्रांती म्हणत नाहीत रे

## गळाबंद बुलंद आवाज

लोखंडी दरवाजाकडे फिरकू नये म्हणतात
परंपरेचे तेजाळलेले धारदार सुळे
हत्तीच्या गंडस्थळासारखे कपाळमोक्ष करतात

जायचे असेल तर ' चमचे ' म्हणून जा
तेथले सेवक तुमच्यावर चवऱ्या ढाळतील
' साहेबाचा माणूस '– पहारेकरी सलाम ठोकतील.

कुठल्यातरी देशात म्हणे, टेलिफोनवरचे संवाद
काळचा मांज्याने पतंग छाटावी तसे छाटतात
शंभर किलोमीटरच्या पुढे गुहेत गेलात
म्हणजे तुमचे निर्भय पाय कापले जातात.

इथे आम्ही स्वतंत्र वाऱ्यात शुभ्र कबुतरे उडवतो
मारुतीची बेंबी गार अशा हुलकावण्या देत
अस्वलासारख्या गुदगुल्या करीत कळपात ओढतो
स्वर चार अंगुळे चढलाय तर शॉक ट्रीटमेंट देतो.

कालपरवा पत्रावळीवर लिहिले ' नोटेड प्लीज '
उग्र घोषणेपासून दूर रहा अन् सरपटणारे किडे व्हा
तुरुंगाच्या गजासारख्या वाटतात या इन्क्रीमेंटच्या रांगा
गळाबंद बुलंद आवाज, चार भिंतीत कोंडला गेला.

## जाळ

तुम्हीं कोणत्याही कड्यावरून फेका
पंज्याखालची माती सुटणार नाही
तुम्ही कोणतेही लेबल लावा
धुमसणारा जाळ विझणार नाही.
ज्यांची माझ्या जन्माच्या वेळी
समाज कार्याची नाळ कापली
माकडाच्या गोष्टीसारखे
पिल्ले पायदळी तुडवून
ते पहा वरवर सरकत गेले
आता लोडाला टेकून बोलू लागले
'हे पंचवीस हजार वर्षाचे दुखणे
पंचवीस वर्षात कैसे पुसणे
लोकहो धीर धरा रे, धीर धरा;
धीरादमाचा खेळ बरा'
ज्या गावच्या बोरी–बाभळी
अशा विलायती कशा झाल्या
तेरड्याचा रंग तीन दिवस
तशा बघता बघता पालटल्या
तुम्ही कोणत्याही कड्यावरून फेका
पंज्याखालची माती सुटणार नाही
तुम्ही कोणतेही लेबल लावा
धुमसणारा जाळ विझणार नाही

## खांडववन

खांडववन जाळणारे तुमचे पिढीजात हात
आजही तुम्ही पारंगत वडवानल पेटविण्यात
तुम्ही पेटविला आगडोंब : आकाशभर ज्वाला
निबीड अरण्यात श्वापदाच्या लपलपणाऱ्या जिभा
रचलीत बेचाळीस माणसे कडबा रचतात तशी
लावली काडी, आत्मतृप्तीसाठी का यज्ञी बळी
कोवळ्या अर्भकांना चितेत फेकतांना हाले ना पापणी
कापरासारखे जाळलेत देह तुमचा साधा उसासा नाही
' अस्पृश्य ही का माणसे ? कुत्र्या मांजराची औलाद
त्यांनी नुस्ती सेवा करावी, प्रारब्धाने केलेत दास '
सभोवती रोम जळते, सारंगी छेडीत आजही गातो
पोथीनिष्ठ धर्मपिठावर परंपरागत तुमचा निरो
निर्भयतेने सुटणारे एखादे चिटपाखरू लिलया टिपता
पिढ्यान पिढ्या केलीत कोंडी तुमचा सन्मुख रथ उभा
महाभागांनो ! असे का होते कधी कुणाचे निःसंतान
आजही वाढती तक्षक मातेमातेच्या गर्भागर्भात.

## फाळ

जिभेच्या शेंड्यावर जहरी नागीण डसवून घेता
म्हणता जीव तारांगणात भटकणारा चंडोल होतो
पाठीचे मणके सुटलेला गोण्या वहाणारा बाप
रक्त गुळणी सावरीत तीळ तीळ भुईत खचला जातो
स्वतःच्या अस्तित्वासाठी लावता एकमेका गळ्याला तात
पहावत नाही झुलत्या मनोऱ्यात चाललेला नंगा नाच
'वाडग्यात पाणी वाढ ग माय' लक्तरात उभी माय
जिथल्या दुधावर पोसला पिंड, मातीलाच विसरलात काय !
घुसळून वर आलेली साय अशी मयखान्यात नासवली
कुणाच्या तोंडाकडे पहावे काळजीने नांगरलेल्या चेहऱ्यांनी
भट्टीत तावून सुलाखून निघालेले सळसळते ना तुम्ही फाळ
भंगाराला देणाऱ्या लायकीचे आता संपला तुमचा काळ

# झाड

दु:खाने गदगदतांना हे झाड मी पाहिलेले
तशी याची मुळे खोलवर बोधिवृक्षासारखी
बोधिवृक्षाला फुले तरी आली
हे झाड साऱ्या ऋतूत कोळपून गेलेले

धमनी धमनीत फुटू पहाणाऱ्या यातना
महारोग्याच्या बोटासारखी झडलेली पाने
हे खोड कसले ? फांदी फांदीला जखडलेली कुबडी
मरण येत नाही म्हणून मरणकळा सोसणारे
दु:खाने गदगदताना हे झाड मी पाहिलेले

## तारे

झंजावाती वादळाला बिचकून कितीदा खारे पाणी गाळशील
तसा तू आजही चिखलात नुस्ते अश्रूचे का तळे पोसशील
माणसाचे मन आतले, बाहेरचे, वरवरचे; तुला का गूढ वाटावे
ज्या चिखलात तुझे पाय रूपले, तेथल्या परिस्थितीचे मुखवटे
कधी दोर होऊन निपचीत पडलेले, कधी सर्प होऊन पेटलेले
आपल्याच रक्तामासाचा खच करीत, फुफाटत भोवती फिरलेले
कुणी आपल्याला असे हैवान केले, याचा मागमूस न पारखणारे
फार गळ्याशी आले, तर दैवावर हवाला ठेवून गुहेकडे परतणारे
शेवाळावर असे तरंग साचले, तेथूनच ना सहस्र कमळ फुटलेले
त्यांच्या हाताशी हात दे, हेच आकाशाचे तारे खुडून आणणारे

## ब्रोकन मेन

इतिहासाकडे तोंड करून
भुतासारखी माणसे जेव्हा चालू लागतात
तेव्हा आदिमानवासारखे पाषाणयुद्ध होते
महानगरातील यंत्रयुगाच्या चाळी
कबुतरांची खुराडी रहात नाहीत
शेवाळलेले अजस्र भुईकोट किल्ले होतात
'आपली माणसे पारखून घ्या रे
इखादी फितुराची औलाद घुसायची'
मनातल्या तटबंदी वरवर सरकत जातात
काळोखात लोखंडी दरवाजे करकरतात

भुसा भरलेल्या जंगली जनावरांपुढे
सजलेल्या हंड्याझुंबरांच्या दरबारात
सिंहासनावर बियरचे घुटके घेत
येथेही राजा फर्मान काढीत असतो
'वॉलकॉट गँगला पाठीशी बांधून
शत्रूंना नाक्यानाक्यावर जेरबंद करा
गच्चीवरून दगडांचा वर्षाव, सोबतीला
सोडा वॉटरच्या बाटल्या ॲसिड बल्ब
गोफणी भिरकावा बेताल टाळकी शेका
आभाळात उडणारे एखादे चिटपाखरूही टिपा
हुक्का गुडगुडी बंद, दळण सरपण बंद
चौपनवाली दिसली तर कडेलोट सजा

जंगलाचा कायदा मानगुटी बसवा
गावगाड्यातून सुटलेले ब्रोकन मेन
तोंडापुढे मडके पाठीला बोराटी काठी
विसरला गेलेला इतिहासाचा आरसा
क्षणाक्षणाला त्यांच्यापुढे मिरवा
गुलामांना म्हणावं आपल्या पायरीनं वागा.'

सार्वभौम राजा फिका वाटावा
असा हा मांडलिक राजा
सार्वभौमाच्या बळावर उडणारा
कोणता सार्वभौम कोणता मांडलिक
कधी कधी संभ्रम पडणारा
सत्तेचे का असे साटेलोटे असते ?
पुन्हा मुंबई बेट आंदण दिले जाते
आधुनिक युगातील टियर गॅस
थ्री नॉट थ्री बंदुकीच्या गोळ्या
हत्तीच्या अंबारीतून मिरवत येतो
फौजफाटा कमी पडतो म्हणून की काय
बापाचा डगला पोराला डकवून
दंडुका दंडुका तुटून पडतो
म्हातारे कोतारे पाहिले जात नाहीत
चिल्लीपिल्ली बायाबापड्या–धिरडे होतात
सारी सारी बिळे बुझवली जातात
हवा मिळणार नाही याची काळजी घेतात
चटणीसारखा झणझणीत अश्रुधूर
बिळाबिळात नळकांडी फोडतात

मिसरुड फुटलेली तरणीबांड पोरे
कफन डोक्याला बांधून रस्त्यावर येतात
तुरुंगाचे गज त्यांचे हसत सोबती होतात

पाय तुटलेला महार पलटणीतला कांबळे
अंधारात भिटभिट्या डोळ्यांनी पहात असतो
' आपण सीमेवर कुणासाठी लढलो
का बरे देशासाठी खुडलो गेलो '
जिवाच्या आकांताने प्रश्न भेदून जातो
आधीच हिरावून घेतलेली बंदूक
उशापायथ्याशी तो चाचपताना दिसतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम २०१२४ दि. ३/१०/९९
२११०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. २०१२४

REFBK-0020124
REFBK-0020124